## प्रकरण २ रे

# साहित्य, समाज आणि संस्कृती : स्वरूप आणि विश्लेषण

# प्रकरण २ रे

# साहित्य, समाज आणि संस्कृती : स्वरूप आणि विश्लेषण

**१. गौरवग्रंथांचे स्वरूप (साहित्य, समाज आणि संस्कृती)**

**२. अनुबंध**

२.१ व्यक्तिगत जीवन

२.२ संपादक

२.३ चळवळीतील कार्यकर्ता

२.४ शिक्षक- मार्गदर्शक

२.५ वक्ता

२.६ नवोदितांचा प्रेरणास्त्रोत

**३. विचार**

३.१ कवीमनाचा संशोधक

३.२ तत्त्वनिष्ठ विचारवंत

३.३ साहित्यविषयक विचार

३.४ वैचारिक लेखन

३.५ दलित साहित्य विचार

३.६ संत साहित्य विचार

३.७ दलित साहित्य चळवळीचे त्रिपिटक

**४. साहित्य, समाज आणि संस्कृती**

४.१ विकासवाद आणि कला

४.१.१ स्पेन्सरचा कला विकास सिद्धांत

४.१.२ कला व शास्त्रे यांचा विकासवादाच्या संदर्भात विचार

४.१.३ विकासवाद व नवी समीक्षा सहसंबंध

४.१.४ विकासवाद व साहित्यप्रकार

४.१.५ रेन वेलेक व ऐतिहासिक सापेक्षतावाद

४.१.६ विकासवादाला केला जाणारा विशेष

४.१.७ विकासवादावरील साक्षेप

४.२ शिक्षण आणि संस्कृती

४.३ दलित अभिजनवादाची मीमांसा

४.४ दलित आत्मकथनांचा अभ्यास

४.५ प्रतिकारवादी सौंदर्यशास्त्र : ग्रामीण व दलित साहित्य

४.६ भारतीय राज्यघटना

४.७ बाबासाहेब आंबेडकर यांची समाजरचनेची सैद्धांतिक मांडणी

४.७.१ गटाचे विभाग

४.७.२ संस्था

४.७.३ संस्था व मानसिकता

४.७.४ संस्थेचे प्रकार

४.७.५ समाजरचनेचे प्रभावक्षेत्र

४.७.६ समाजरचनेची बांधणी

४.८ बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध तत्त्वज्ञान यांचा विचार

४.९ सांस्कृतिक दहशतवाद व भारताचे भवितव्य

४.९.१ सांस्कृतिक दहशतवाद

४.९.२ दहशतवादाचे परिणाम

४.१० सेक्युलर राज्य व बुद्ध धर्म

४.११ फुले, आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या भारताचा विचार

४.१३ आंबेडकर व प्राचीन शासनव्यवस्था

४.१४ भगवान बुद्ध व यज्ञसंस्था

**५. पत्रव्यवहार व छायाचित्रे**

# प्रकरण २ रे

# साहित्य, समाज आणि संस्कृती : स्वरूप आणि विश्लेषण

गौरवग्रंथ स्वरूप, त्या ग्रंथामागील प्रेरणा व गौरवग्रंथांची परंपरा यांचा परामर्श पहिल्या प्रकरणात घेतलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात दलित साहित्याचे भाष्यकार व समीक्षक गंगाधर पानतावणे यांच्यावरील लिहिल्या गेलेल्या गौरवग्रंथाचे स्वरूप मांडून विवेचन करावयाचे आहे. त्या दृष्टीने या ग्रंथामध्ये व्यक्त झालेले पानतावणे यांचे व्यक्तिगत जीवन, वाङ्मयीन कर्तृत्व, त्याचबरोबरच त्यांचे सामाजिक योगदान याविषयी विवेचन करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

## १. गौरवग्रंथाचे स्वरूप ( साहित्य, समाज आणि संस्कृती ) :-

अलिकडील चार-पाच दशकातील मराठी वाङ्मय आणि मराठी समीक्षा परंपरेतील एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे गंगाधर पानतावणे होय. महाराष्ट्रातील सर्व स्तरातील आणि बहुतेक सर्व प्रवाहातील साहित्याच्या लेखनकृतींना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना, त्यातून दिसून येणारी विवेकनिष्ठा साहित्यविषयक जाणिवेचा प्रत्यय देणाऱ्या आहेत. धर्म, संस्कृती, समाज यांविषयी त्यांनी सतत परखड विचार मांडलेले आहेत. त्यांना दलित साहित्याचे भाष्यकार मानले गेले असले तरी एकूण मराठी साहित्याबद्दल आत्मियतेने परंतु वस्तुनिष्ठ भूमिकेतून त्यांनी वैचारिक चिंतन मांडलेले आहे.

मराठी दलित वाङ्मयाच्या संबंधाने त्यांनी विशाल व व्यापक भूमिका मांडलेली आहे. 'अस्मितादर्श'चे संपादन, समीक्षालेखन, वैचारिक लेखन, विविध विद्यापीठांमधून दिलेली व्याख्याने, साहित्यसंमेलनातील भाषणे यातून त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट झालेली आहे. आंबेडकरांचे विचार, साहित्य, समाज आणि संस्कृती, दलित साहित्याची त्रिसूत्री, दलित साहित्याची भाषा, दलित साहित्याचे प्रकार, आजची मराठी समीक्षा, दलित तसेच ग्रामीण वाङ्मय, संत साहित्य इ. कितीतरी साहित्यनिहाय मूलभूत घटक प्रवाहाची साधार तसेच लक्षवेधी चर्चा गंगाधर पानतावणे यांनी केलेली आहे.

ऑक्टोबर १९८२ साली आनंदवन येथे झालेल्या साहित्य संमेलनात पानतावणे यांनी साहित्य, समाज आणि संस्कृतीबद्दल आपली भूमिका प्रभावीपणे स्पष्ट केलेली आहे. केवळ आंबेडकरी चळवळीमुळे व विचारांमुळेच भारतातील दलितांना आत्मभान प्राप्त झालेले आहे, असे त्यांचे मत आहे.

एक विचारवंत, एक संपादक, एक समीक्षक, एक शिक्षक, एक माणूस, एक रसिक अशा असंख्य दिशांना व्यापणाऱ्या या बहुआयामी व्यक्मितत्त्वाच्या ( समीक्षकाच्या ) व्यक्तिगत जीवनाबरोबरच त्यांच्या समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा पट 'साहित्य, समाज आणि संस्कृती' या गौरवग्रंथात उलगडून

दाखविलेला आहे, हेच दिसून येते. त्याचबरोबर साहित्य, समाज आणि संस्कृती याबद्दलचे नवार्थदर्शन प्रस्तुत ठिकाणी स्पष्ट झालेले आहे. दलित चळवळ व दलित साहित्या यांबद्दलचे विचार तसेच संस्कृती, समाज, इतिहास यांचे नेमके चिंतन आलेले आहे.

'अस्मितादर्श' या नियतकालिकाद्वारे दलित चळवळ व साहित्य यांना व्यापक परिमाण देणारे व त्याचबरोबर मौलिक चिंतन मांडणारे गंगाधार पानतावणे अभ्यासक, लेखक, समीक्षक म्हणून ज्ञात आहेत. त्यांच्या वाङ्मयीन भूमिकेचे, आंबेडकरवादी विचारांचे आणि साहित्य, समाज आणि संस्कृती इ. संदर्भात माधवी खरात[१] यांनी सामान्य वाचकांसाठी 'साहित्य, समाज आणि संस्कृती वाङ्मयीन कर्तृत्वाची मांडणी' या लेखांमध्ये परिचयपट दिलेला आहे. व्यक्तिगत जीवनाबरोबरच त्यांच्या समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा मागोवा घेतलेला आहे.

## २. अनुबंध :-

'साहित्य, समाज आणि संस्कृती' या गौरवग्रंथाचे प्रामुख्याने चार विभाग दिसून येतात. त्यातील अनुबंध या पहिल्या विभागात गंगाधर पानतावणे यांचे व्यक्तिगत जीवन व वाङ्मयीन कर्तृत्व या दोन्हींचा परामर्श घेतलेला दिसून येतो. मित्र-सन्मित्र, शिक्षक-मार्गदर्शक, संपादक-लेखक, वक्ता-विवेचक असे पानतावणे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलघडले आहेत.

### २.१ व्यक्तिगत जीवन :-

गंगाधर पानतावणे यांच्या व्यक्तिगत जीवनाचे दर्शन घडविणारे लेख गौरवग्रंथात आलेले आहेत. या लेखांमधूनच एक माणूस व रसिक म्हणून पानतावणे यांचे जीवन दर्शन प्रकट झालेले आहे. 'माझे मित्र'[२] या रा. ग. जाधव यांच्या लेखांमधून त्यांचा गंगाधर पानतावणे यांच्यासोबत असणारे स्नेहसंबंध दिसून येतात. इ. स. १९६४ मध्ये औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयामध्ये मराठीचे व्याख्याता म्हणून रूजू झाल्यानंतर पानतावणे यांच्यासोबत निर्माण झालेले ऋणानुबंध दिसून येतात. पहिल्याच भेटीत पानतावणे सरांच्याबरोबर जुळलेले सूर आणि त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा पडलेला प्रभाव दिसून येतो. गंगाधर पानतावणे यांचे सुस्पष्ट बोलणे, बोलण्या-वागण्यातला सुसंस्कृतपणा प्रस्तुत लेखांतून दिसतो.

पानतावणे सरांच्या घरी गेल्यानंतर तेथे होणारे अगत्य-स्वागत त्याचबरोबर मिलिंद महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. वडजीकर यांच्या चोखंदळपणाचा झालेला लाभ आणि केवळ पानतावणे सरांमुळेच त्यांच्याशी झालेली ओळख हेच दिसून येते. श्री. वडजीकर, पानतावणे सर व स्वत: रा. ग. जाधव या तिघांच्या वाङ्मयीन आवडी-निवडी वेगवेगळ्या असल्या तरी वाङ्मयाबद्दल असणारे औत्सुक्य तसेच उदार व सर्वसमावेशक दृष्टिकोणाचे चित्रण झालेले आहे. स्वत:च्या नकळत सदैव काहीतरी नवे शोधणे हाच गंगाधर पानतावणे यांचा गुणविशेष दिसून येतो.

'अस्मिता' व पुढे 'अस्मितादर्श' या नावाने जी दलित साहित्य चळवळ निर्माण झालेली आहे व ज्या पद्धतीने गंगाधर पानतावणे यांनी संगोपन व संवर्धन केलेले आहे त्याचा आढावा रा. ग. जाधव यांनी घेतलेला आहे. दलित साहित्याला स्वागतशील प्रतिसाद क्षेत्र बनविण्यात पानतावणे यांनी केलेले कार्य तसेच दलित साहित्याचे महत्त्व व प्रयोजन यांना व्यापक समाजाची निर्विवाद मान्यता मिळवून देण्यात गंगाधर पानतावणे यांनी दिलेल्या योगदानाचा रा. ग. जाधव यांनी आढावा घेतल्याचे दिसून येते.

'वादळाचे वारसदार' या लेखामध्ये जनार्दन वाघमारे यांनी पानतावणे सरांचा 'वादळाचे वारसदार' असा केलेला सार्थ गौरव दिसून येतो. विदर्भ ही जन्मभूमी असूनही मराठवाडा या कर्मभूमीत गंगाधर पानतावणे यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. अध्यापन कार्याला संशोधनाची जोड देऊन मिलिंद महाविद्यालयात १५ वर्षे व मराठवाडा विद्यापीठात २० वर्षे अशा एकूण ३५ वर्षे पानतावणे सरांच्या सेवेचा गौरव जनार्दन वाघमारे यांनी केल्याचे दिसून येतो.

एक वाङ्मयीन नियतकालिक म्हणून 'अस्मितादर्श' चे स्थान आणि गंगाधर पानतावणे यांचे कार्य यांचा केलेला गौरव येथे स्पष्ट दिसून येतो. सदैव आर्थिक विवंचनेत असूनही पानतावणे सरांनी त्यांला आजअखेर मिळवून दिलेले चिरंजीवीत्त्व दिसून येते. अध्यापनातून होणारे ज्ञानसंक्रमण आणि संशोधनातून होणारी ज्ञान निर्मिती या पानतावणे सरांच्या दुहेरी कार्याचे विवेचन केलेले आहे. 'अस्मितादर्श' चे कार्य व दलित साहित्य चळवळीचा विकास ही दोन्ही कार्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे दिसून येते.

'सन्मित्र-गंगाधर पानतावणे' या लेखात केशव मेश्राम व गंगाधर पानतावणे यांच्यातील स्नेह-संबंधाचे विश्लेषण आलेले आहे. मिलिंद कला महाविद्यालयात व्याख्याता म्हणून रूजू झाल्यानंतर तेथील विद्यार्थी, सहकारी यांच्यावर पडलेला प्रभाव येथे दिसून येतो. इतर प्राध्यापकांच्या तुलनेत वयाने लहान असूनही पानतावणे यांच्या मनात अनेक संकल्प-प्रकल्प आणि योजनांचे असणारे गुप्त खजाने केशव मेश्राम यांनी उलघडून दाखविलेले आहेत.

'अस्मितादर्श'च्या उदयानंतर केशव मेश्राम व गंगाधर पानतावणे यांच्यातील स्नेहसंबंधाचे प्रत्यंतर या लेखात आले आहे. औरंगाबाद मुक्कामी वावरत असताना पानतावणे सरांचे व्यक्तिविशेष दिसून येतात. त्यांची समृद्ध अभ्यासिका, त्यामधील साफसफाई, रक्तदाबाच्या आजाराने न झेपणारा प्रवास, प्रेमळ पत्नीचा अकालीचा मृत्यू आणि त्यातून आलेली मानसिक वेदना इ. पानतावणे सरांच्या व्यक्तिगत जीवनाचे चित्रण मेश्राम यांच्या लेखात आले आहे.

'अस्मितादर्श'ची अस्मिता अधिक पीळदार करण्यात पानतावणे यांच्या भूमिकेचा परामर्श आलेला आहे. दलित साहित्य चळवळीतील 'अस्मितादर्श' आणि गंगाधर पानतावणे यांचे स्थान व त्यांचे व्यक्तिविशेष केशव मेश्राम यांनी निश्चित केलेले आहेत, हे दिसून येते.

## २.२ संपादक :-

'अस्मितादर्श'चे दलित साहित्य चळवळीतील योगदान आणि संपादक म्हणून गंगाधर पानतावणे यांचे कार्य यांचा परामर्श गौरवग्रंथातील अनेक लेखांमध्ये घेण्यात आलेला आहे. 'अस्मितादर्श' चे संगोपन व संवर्धनातील पानतावणे सरांच्या संपादक म्हणून असलेल्या भूमिकेचा येथे गौरव करण्यात आलेला आहे, हेच दिसून येते. आर्थिक विवंचनेवर मात करून 'अस्मितादर्श' ची वाङ्मयीन कामगिरी व पानतावणे सरांच्या कार्याचा आलेख रेखाटलेला आहे.

'गंगाधर पानतावणे आमचे 'सर' संपादक' या लेखामध्ये फ.मुं. शिंदे यांचे 'अस्मितादर्श'चे सहसंपादक या नात्याने पानतावणे सरांशी असणारे ऋणानुबंध दिसून येतात. औरंगाबादच्या सहवासात फ. मुं. शिंदे यांना सरांच्या अधिक जवळ जाता आले, व्यक्तिमत्त्व न्याहाळता आले, हेच दिसून येते. शिंदे यांच्या मते 'खरं तर एखाद्या संपादकांचे व्यक्तिमत्त्व त्यानं लिहिलेल्या पत्रातून अधिक उभं राहतं. प्रत्यक्ष न भेटता-पाहता.'[३] या प्रमाणेच सरांच्या अनेक पत्रांमधून त्यांचे व्यक्तिमत्त्व साकार झालेले आहे. ही सर्व पत्रे एकत्र केली तर सर 'संपादक' म्हणून साकार झालेले आहेत. सरांची पत्रेही नवोदित लेखकांसाठी प्रेरणांची कारंजी होती हेच दिसून येते. 'अस्मितादर्श'चे सबंध काम पानतावणे सर एकटेच करत असत. त्यावेळी आणि आजही सर्व काम एकटेच पाहतात हेच दिसून येते. त्यावेळी वामन निंबाळकर सहसंपादक होते. सरांनी त्यांच्या जोडीला फ. मुं. शिंदेंना संधी दिली. यावेळी सरांना अनेकांच्याकडून जो प्रश्नात्मक आहेर मिळाला त्याचाही परामर्श येथे आलेला आहे. फ. मुं. ला संपादक करून 'आपली' माणसं दूर ठेवायची हे बरोबर आहे का ? हाच या लोकांचा प्रश्नात्मक रोख आहे हे दिसून येते. परंतु अशा संकुचित मनोवृत्तीची पर्वा न करता पानतावणे सरांनी संपादक म्हणून जे कार्य केले आहे ते स्पष्ट झालेले आहे.

सरांसोबत काम करीत असताना महाराष्ट्राभरच्या घटना, व्यक्ती इ. झालेला उहापोह, अनेक साहित्यिकांची पत्रे एकत्र वाचण्याची मिळालेली संधी, त्यामधून पानतावणे सरांविषयी व्यक्त केले गेलेले प्रेम इ. गोष्टी सहसंपादक या नात्याने फमुंनी दाखवून दिलेल्या आहेत.

चंद्रपूर येथे भरून गेलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलन आणि अध्यक्षपद निवडणूकीचा झालेले गोंधळ, पानतावणे सरांना मिळालेली उमेदवारी आणि तांत्रिक कारणामुळे त्यांचा झालेला पराभव इ. उहापोह करण्यात आलेला आहे. अनेक छोट्या-मोठ्या प्रसंगातून फ. मुं. शिंदे यांनी गंगाधर पानतावणे यांच्या संपादकत्त्वाचे दर्शन घडविले आहे.

'अस्मितादर्श - हाच पानतावणे यांचा गौरव' या लेखामधून प्रेमानंद गज्वी यांनी सरांच्या संपादन कौशल्याचे दर्शन घडविलेले आहे. प्रेमानंद गज्वी स्वत: एक कवी आहेत. त्यांच्या काही कविता अस्मितादर्शमध्ये छापून आलेल्या आहेत. परंतु याच दरम्यान त्यांनी कथा लेखनाचा प्रयोग केला. 'निर्धार'

नावाची कथा त्यांनी अस्मितादर्शसाठी पाठविली. महिन्याभरात पानतावणे सरांचे पत्र आले ''तुम्हाला कविता जमते तशी कथा जमत नाही.''[४] सरांचे हेच बोल पुढे सिद्ध झाल्याचे प्रेमानंद गज्वी यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वातून दिसून येते.

पानतावणे यांच्या कुशल संपादकत्वाचे दर्शन घडलेले आहे. 'अस्मितादर्श' चे झालेले मेळावे, अध्यक्षपदावरून झालेली भाषणे, परिसंवाद, कवी संमेलने, कथाकथन तसेच शोधनिबंध यांचे वाच यांमधून पानतावणे यांच्या कार्याची प्रचिती दिसून येते. आर्थिक अस्थैर्याच्या काळात, विवंचनेच्या कालखंडात अस्मितादर्श बंद न करता आंबेडकरी विचार जागवण्याचे कार्य सरांनी संपादक म्हणून केलेले आहे, हेच दिसून येते.

## ३. चळवळीतील कार्यकर्ता :-

महाराष्ट्राच्या मातीत रूजलेल्या दलित साहित्य चळवळीला खतपाणी देणाऱ्या 'अस्मितादर्श' आणि गंगाधर पानतावणे यांच्या कार्याचा गौरव आलेला आहे. 'दलित साहित्य चळवळीचा आधारवड' या लेखात अर्जुन डांगळे यांनी त्यांच्या चळवळीतील कार्याचा पट उलघडून दाखवलेला आहे. व्यक्तिश: अर्जुन डांगळे यांचे वाङ्मयीन कर्तृत्व हे अस्मितादर्शचे (find) शोध आहे, हेच दिसून येते.

१९२० नंतर मराठी वाङ्मयात प्रस्थापित साहित्यविरोधात जी वाङ्मयीन चळवळ निर्माण झाली त्याचेच विवेचन लेखात आलेले आहे. विशेषत: अनियतकालिकांची जी चळवळ रूढ झाली त्याचा आढावा अर्जुन डांगळे यांनी घेतलेला आहे. वि. पु. चित्रे, राजा ढाले, सतीश काळसेकर, अशोक शहाणे, चंद्रकांत खोत, तुलसी परब, वसंत गुर्जर यांच्या पुढाकाराने जी चळवळ निर्माण झाली तसेच 'येरू', 'असो', 'फक्त', 'टिंब', 'भारूड' यांच्या कार्याचा परामर्श घेतलेला आहे. दलित साहित्य चळवळ, पुरोगामी साहित्य आणि 'लिटिल मॅगझीन' या तीनही चळवळी जरी स्वतंत्र आणि समांतर असल्या तरी त्यामध्ये वैचारिक नाते आहे हेच दिसून येते.

१९६७ हे वर्ष दलित साहित्य चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. याचे कारण म्हणजे दलित वाङ्मय प्रवाहाविषयी, नव्या जीवन जाणिवांविषयी विचार करणारे म. ना. वानखेडे, म. भि. चिटणीस, बाबूराव बागूल, केशव मेश्राम, घन:श्याम तळवटकर, दिनेश लखमापूरकर, चोखा कांबळे, जनार्दन वाघमारे, स्वत: अर्जुन डांगळे इ. सर्वांनी मुंबई इथे 'महाराष्ट्र बौद्ध साहित्य संस्थे'च्या वतीने संमेलन भरवले व त्यामध्ये साहित्यचर्चा घडवून आणली हे दिसून येते. रामायण, महाभारत, संत कवी, अर्वाचीन मराठी साहित्याची समीक्षा यामध्ये दलित विश्वाला अजिबाबत स्थान नाही. त्यामुळे दलित लेखकांनी बंडखोर बनून निग्रो साहित्याप्रमाणे आपले स्वत:चे वाङ्मय निर्माण करून आपल्या समस्यांना न्याय मिळवून द्यावा हेच आवाहन त्यांनी केले होते हे दिसून येते.

दलित साहित्यचळवळीचे केंद्रस्थान म्हणून औरंगाबादचा विचार आलेला आहे. औरंगावाद येथील 'मिलिंद' या महाविद्यालयातून घडलेले विद्यार्थी, प्राचार्य म. भि. चिटणीस यांचे मार्गदर्शन, म. ना. वानखेडे यांचा निग्रो साहित्याचा अभ्यास या सर्वांचा परामर्श अर्जुन डांगळे यांनी घेतलेला आहे. मिलिंद साहित्य परिषदेची स्थापना दलित साहित्य चळवळीला चालना देणारी ठरली, हेच दिसून येते. याच दरम्यान विद्यार्थ्यांच्या सहाय्याने फंड उभारून 'अस्मिता' नावाचे वाङ्मयीन त्रैमासिक सुरू करण्यात आले. म. ना. वानखेडे हे संपादक तर गंगाधर पानतावणे, रा. ग. जाधव, वामन निंबाळकर, सुखराम हिवराळे इ. सहाय्यक संपादक होते. एकूण त्या काळात दलित लेखकांची वैचारिक कोंडी फोडण्याचे कार्य अस्मितादर्शने केले हे दिसून येते. उदयोन्मुख दलित लेखकांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यातूनच दलित साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने आकाराला आली हे दिसून येते. सामाजिक जाणीवांनी संपन्न असणारे बाबूराव बागूल, शंकरराव खरात, केशव मेश्राम इ. चे लेखन तर या काळात सुरू होतेच परंतु अनेक नवीन चेहरे यामध्ये सामील झाले. १९६४ नंतरच्या काळात दलित साहित्याची भूमिका व वैचारिक बैठक मांडली गेली. दया पवार, वामन निंबाळकर, स्वत: अर्जुन डांगळे, उमाकांत रणधीर, ज. वि. पवार, त्र्यंबक सपकाळे, सुधाकर गायकवाड, फ. मुं. शिंदे, योगीराज वाघमारे, योगेंद्र मेश्राम हे त्या काळातील लेखक आहेत हे दिसून येते.

अस्मितादर्श हे आंबेडकरी विचार व चळवळींचे नियतकालिक आहे. गंगाधर पानतावणे यांनी अस्मितादर्शला स्वत:चे अस्तित्व मिळवून दिलेले आहे, हेच दिसून येते.

## ४. शिक्षक-मार्गदर्शक :-

गंगाधर पानतावणे महाराष्ट्रातील साहित्यिक, विचारवंत, समीक्षक, अस्मितादर्शचे संपादक म्हणून ज्ञात आहेत. दलित साहित्यचळवळीच्या अनुषंगाने आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे भाष्यकार म्हणून परिचित आहेत हे दिसून येते. मात्र एक शिक्षक-मार्गदर्शक म्हणून असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व फारसे ज्ञात नाही. 'एक समाजशिक्षक आणि मार्गदर्शक'[६] या लेखात कृष्णा किरवले यांनी त्यांचे हेच व्यक्तिमत्त्व उलघडून दाखविलेले आहे. त्यांच्या अप्रकट व्यक्तिमत्त्वाला प्रकट करून दाखविलेले आहे.

संशोधक-मार्गदर्शक या नात्याने पानतावणे सरांकडे पाहताना आलेले अविस्मरणीय अनुभव कृष्णा किरवले यांनी शब्दबद्ध केले आहेत हेच दिसून येते. पानतावणे सरांनी स्वत: कोणताही मार्गदर्शक न घेता पीएच्.डी. पदवी प्राप्त केलेली आहे. त्यामुळे त्यांच्यासारखा संशोधक मर्गादर्शक मिळणे हे कृष्णा किरवले भाग्याची गोष्ट मानतात. केवळ अपघातानेच किरवले यांना पानतावणे सर संशोधक म्हणून उपलब्ध झाले हे स्पष्ट झालेले आहे. पानतावणे सर वेळेच्या बाबतीत अत्यंत दक्ष असत. प्रबंध लेखनात सूत्रबद्धता, योग्य मांडणी, सप्रमाण विश्लेषण, सुस्पष्ट भाषा, शुद्धलेखन आणि विचारांचे योग्य

आकलन यांना अतिशय महत्त्व देत हेच दिसून येते. संशोधनासाठी कोणतीही शिष्यवृत्ती नसताना कृष्णा किरवले यांना करावा लागलेला संघर्ष, प्रबंधलेखनात होणाऱ्या चुका, प्रसंगी पानतावणे सरांनी विसंग लक्षात येता धारण केलेला रौद्र अवतार, आपल्या विद्यार्थ्यांला जीवनाबद्दल केलेले यथायोग्य मार्गदर्शन हेच प्रस्तुत लेखातून आलेले आहे. आपल्या विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी सरांनी केलेले प्रयत्नांमध्ये जिव्हाळा भरलेला आहे हेच दिसून येते. त्यांनी आपला 'साहित्य : प्रकृती आणि प्रवृत्ती' हा ग्रंथ चिंतामण कांबळे, संपत गायकवाड, ऋषीकेश कांबळे आणि कृष्णा किरवले या चार विद्यार्थ्यांना समर्पण केलेला आहे. यावरून पानतावणे सरांचे आपल्या विद्यार्थ्यांवर किती प्रेम होते हे दिसून येते.

गंगाधर पानतावणे यांच्या चिंतनाचा विषय जरी दलित साहित्य असा असला तरी एक शिक्षक म्हणून अध्यापनासाठी ते 'मध्ययुगीन मराठी साहित्य', 'आधुनिक मराठी साहित्य', 'समीक्षा' किंवा 'एका लेखकाचा अभ्यास' असा विषय निवड करीत हेच दिसून येते. मध्ययुगीन मराठी साहित्याचे अध्यापन करीत असताना पानतावणे सर अध्यात्मिक अनुभूती आणि दैवशरणतेपेक्षा ते सांस्कृतिक अवस्थांतराची मालिका उलघडून दाखवित असत हेच दिसून येते.

एक शिक्षक-मार्गदर्शक म्हणून पानतावणे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू कृष्णा किरवले यांनी प्रकट केले आहे हे दिसून येते.

**५. वक्ता :-**

अस्मितादर्शचे संपादक, साहित्यिक, दलित साहित्याचे भाष्यकार अशा रितीने गंगाधर पानतावणे हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे, हे दिसून येते. संपादक, समीक्षक, संशोधक, संशोधन-मार्गदर्शक, कवी, कथाकार, नाटककार, लोकसाहित्याचे अभ्यासक या सर्वांबरोबर सर वक्ता-विवेचक आहेत.

डॉ. पानतावणे कोणत्याही विषयावर भाषण देत असताना आपण आंबेडकरवादी सांस्कृतिक प्रणालीचे भाष्यकार आहोत, या भूमिकेतून आपली भूमिका मांडत असतात, हे दिसून येते. वाचनसंस्कृतीचा ऱ्हास होत असताना सरांनी ही संस्कृती जोपासली आहे हे त्यांच्या वक्तृत्वातून स्पष्ट झालेले आहे. एखाद्या विषयाची सूक्ष्म मांडणी करणे, विषयातील वैचारिकता श्रोत्यांपुढे ठेवणे, तर्कशुद्ध वैचारिक मांडणी करणे, प्रतिपक्षाचे मत खंडन करून स्वतःच्या मताचे प्रतिपादन करणे हेच सरांच्या कर्तृत्वाचे विशेष आहे. हे दिसून येते.

डॉ. पानतावणे यांचे भाषणाचे विषय किती वैविध्यपूर्ण आहेत हे दाखवून देण्यासाठी भगवान ठाकूर[७] यांनी काही विषयांची सूची दिलेली आहे.

१) महाराष्ट्रातील समाजप्रबोधन : बेरीज आणि वजाबाकी २) शरद्चंद्र मुक्तिबोध यांचे साहित्य ३) महात्मा फुले यांच्या साहित्याची भाषा ४) बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता ५) शिक्षण आणि

संस्कृती ६) १९६० नंतरच्या मराठी साहित्यातील नवे प्रवाह ७) अमेरिकेतील काळे साहित्य ८) साहित्य आणि समाज ९) दलित साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप १०) दलित वैचारिक वाङ्मय ११) दलित रंगभूमीचे मूलस्त्रोत १२) मराठी साहित्य समीक्षा : काही प्रश्न १३) आगरकरांचे समाजचिंतन १४) महानुभावांचे वाङ्मय १५) दलित स्त्रियांची आत्मकथने १६) चोखामेळ्याचे संत घराणे १७) बाबासाहेब आंबेडकर यांचा पत्रव्यवहार १८) आंबेडकरपूर्व दलितांच्या चळवळी १९) मराठीतील कालबाह्य वाङ्मय २०) सार्वजनिक सत्यधर्म २१) माधवराव बागल यांचे क्रांतीकारी विचार २२) सावित्रीबाई फुले यांची कविता २३) छ. शाहू महाराज यांची आरक्षण नीती २४) आंबेडकरी प्रेरणा व दलित साहित्यातील प्रदूषणे २५) मराठवाड्यातील राजकीय व सामाजिक चळवळी २६)कवी केशवसुत हे आदिविद्रोही कवी आहेत काय? इ.बहुविध विषयांचा समावेश सरांच्या भाषणात आलेला आहे.

डॉ. पानतावणे यांची भाषण देण्याची पद्धती, धीरगंभीर सुरूवात, मध्येच मिस्किल उदाहरणांनी, प्रासंगित व्याख्यानांची तात्त्विक सुरूवात या प्रत्येक गोष्टीचे विवेचन या लेखात आलेले आहे. डायसवर ठेवलेले हात वैचारिक आशयानुसार कृतीशील होऊन निवेदन श्रोत्यांपर्यंत पोहचण्याची मालिका भगवान ठाकूर यांनी उलघडून दाखविलेली आहे. सत्कार, ग्रंथप्रकाशन समारंभ असेल तर सत्कारमूर्ती जो कोणी असेल त्यांना सर आपल्या भाषणातून प्रोत्साहित करत असत हेच दिसून येते. भाषण देत असताना उजव्या हाताची होणारी हालचाल, मार्मिक, सुरेख, स्पष्ट, सुस्पष्ट, वस्तुनिष्ठ, विलक्षण, सर्जक, आत्मशोध, आत्मभान इ. शब्दप्रयोग व्याख्यानभर अचूकपणे येतात हे दिसून येते.

## ६. नवोदितांचा प्रेरणास्त्रोत :-

नवोदित साहित्यिक आणि 'अस्मितादर्श'चे संपादक म्हणून गंगाधर पानतावणे यांच्यात निर्माण होणारे नातेबंध उलघडत असताना, पानतावणे सर नवोदितांसाठी प्रेरणास्त्रोत होते हे दिसून येते. शशिकांत हिंगोणेकर[८] यांनी सर नवोदितांसाठी प्रेरणास्त्रोत होते याचेच विवेचन 'जीवनातील प्रेरणादायी शक्ती' या लेखात आलेले आहे. हिंगोणेकर यांच्या संघर्षाच्या काळात त्यांच्या कविता 'अनुष्टुभ', 'सत्यकथा', 'अभिरूची', प्रतिष्ठान येथून साभार परत येत असत. अशावेळी लेखनाची उर्मी संपून जायची. दरम्यानच्या काळात 'अस्मितादर्श' साठी 'एक काळ असा होता' ही कविता स्वीकारली गेली आणि त्यांच्यातील कवीला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाल्याचे दिसून येते.

प्रिय शशी,

स. न.

मध्यंतरी लता येऊन गेली. मनोहर जाधव यांची भेट झाली. तुमचे काय चालले आहे ? एम. ए. पूर्ण झाले का ? थोडेसे अंतर्मुख होऊन विचार करा. फार भावनावश न होता सर्वप्रथम कर्तव्य लक्षात घ्या. काळ मोठा कठोर असतो. असो, तुमचे लेखन काय म्हणते ? जमले तर एकदा येऊन जा.

अशा स्वरूपाच्या पत्रांमधून नवोदितांना दिली जाणारी प्रेरणा व सरांना त्यांच्याविषयी वाटणारी कळकळ दिसून येते.

'अस्मितादर्श' च्या संपादनाची धुरा खांद्यावर घेऊन लेख, कविता, कथा निवडून, नवीन कवींच्या कविता संपादन करून त्यांना मार्गदर्शन करणे व नवोदितांना प्रोत्साहित करणे हेच सरांचे विशेष दिसून येतात. 'गंगाधर पानतावणे / एक चालते+बोलते विद्यापीठ' या दादा गोरे यांच्या लेखात सरांच्या नवोदितांना प्रेरणा देण्याच्या कार्याचे विवेचन आलेले आहे. श्रीमती हिरा बनसोडे यांच्या 'फिर्याद' या कविता संग्रहास दादा गोरे यांनी प्रस्तावना लिहिण्यासाठी केलेला आग्रह, तर दलित संग्रहास प्रस्तावना लिहित असताना निर्माण होणाऱ्या दादा गोरे यांचा प्रश्न यांवर "दादा तुम्ही लिहा. तुम्ही छान लिहू शकता" या सरांच्या आश्वासक प्रेरणादायी शब्दांनी त्यांना मिळालेली प्रेरणा येथे स्पष्ट दिसून येते.

सरांची मिळणारी प्रेरणा, त्यातूनच आपण समीक्षक म्हणून नावलौकिक मिळवू शकतो हेच दादा गोरे यांनी प्रस्तुत लेखात सांगितलेले आहे, हे दिसून येते.

'महासागर' या हिरा बनसोडे यांच्या लेखातून सरांच्या याच व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडून येते. "एवढ्या चांगल्या कविता लिहिता मग 'अस्मितादर्श'ला का नाही पाठवत ? अस्मितादर्श तुमच्यासाठीच आहे." आपल्या नवोदित लेखकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करण्याचा सरांचा प्रयत्न आणि त्यासाठी दिलेली प्रेरणा दिसून येते.

अशा रितीने नवोदित उदयोन्मुख लेखकांसाठी पानतावणे सर प्रेरणास्त्रोत होते हेच दिसून येते.

## ३. विचार :-

गौरवग्रंथाचा दुसऱ्या 'विचार' या भागामध्ये गंगाधर पानतावणे यांच्या आंबेडकरनिष्ठ विचारांचा वेध घेतलेला आहे. मूळचे कवी असणारे पानतावणे सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात वैचारिक साहित्यिक-समीक्षक बनले आणि आजही त्यांची हीच विचारधारा कायम राहिलेली आहे. दलित चळवळीला सामर्थ्य प्राप्त करून देण्यासाठी सामाजिक बांधिलकीची रूजलेली भावना, हिंदू मानसिकतेचा त्याग केल्याशिवाय दलित लेखक नवोन्मेषाची अभिव्यक्ती करू शकणार नाहीत, हाच दलित लेखकांना पानतावणे यांनी दिलेला इशारा त्यांची आंबेडकरवादी भूमिका स्पष्ट करणारा आहे, असे माधवी खरात[१] यांनी म्हटले आहे ते 'विचार' भागातून दिसून येते.

दलित, ग्रामीण, आदिवासी, जनवादी साहित्याचे स्वातंत्र्योत्तर काळातील प्रवाहांचे लक्षणीय चिंतन पानतावणे सरांच्या लेखनातून दिसून येते. दलित साहित्याची सर्वंकष भूमिका पानतावणे यांच्या लेखनातून आलेली आहे. दलित साहित्याचे प्रवाह, त्यांची बलस्थाने, मर्यादा इ. संबंधातही पानतावणे सरांचे विचार आलेले आहेत. दलित साहित्यातील दलित लेखिकांच्या अल्पप्रमाणाची चर्चा आलेली आहे.

गंगाधर पानतावणे यांच्या वरील विचारांचा प्रभाकर मांडे, बाळकृष्ण कवठेकर, मनोहर जाधव, नीलकंठ शेरे इ. च्या लेखांमधून परामर्श आलेला आहे.

## ३.१ कवीमनाचा संशोधक :-

समाजाशी असणारी बांधिलकी लक्षात घेऊन स्वतंत्र लेखन करीत असताना समाजाकडूनही अशा कर्त्यासंबंधीची कृतज्ञता अनेकविध मार्गानी व्यक्त केली जाते. यांपैकीच एक व्यक्तिमत्त्व गंगाधर पानतावणे आहेत. प्रभाकर मांडे[१०] यांनी 'कवीमनाचा व्यासंगी संशोधक' या लेखात पानतावणे सरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा गौरव आलेला आहे. मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागात संशोधन-अध्यापन करीत असताना पानतावणे सरांनी जे कविता वाङ्मयीन कार्य केलेले आहे त्याबद्दल त्यांना सेलू येथील श्री.विनायकराव चारठाणकर प्रतिष्ठानच्या वतीने गौरवण्यात आलेले आहे. तसेच श. वा. किर्लोस्कर जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुरस्कार देऊन गौरव करण्यात आलेला आहे. 'फाय फौंडेशन' चा पंचवीस हजार रूपयांचा पुरस्कारही त्यांना प्राप्त झालेला आहे, हे दिसून येते.

गंगाधर पानतावणे हे मूळचे कवीवृत्तीचे आहेत. आपल्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा प्रारंभ त्यांनी काव्यलेखनाने केलेला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी जीवनापासून हस्तलिखिते, भित्तीपत्रके यांमधून त्यांनी लेखन केलेले आहे आणि पुढे महाराष्ट्रातील वाङ्मयीन नियतकालिकात त्यांच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. नागपूर 'तरूण भारत' चे संपादक व साहित्यिक ग. त्र्यं. माडखोलकर व वि. भि. कोलते यांचाच प्रभाव पानतावणे सरांच्यावर पडलेला दिसून येतो.

अस्मितादर्शचे वाङ्मयीन आणि वैचारिक कार्य लक्षात घेता 'अस्मितादर्श'चे स्वरूप फक्त नियतकालिकापुरते मर्यादित न ठेवता दरवर्षी महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात मेळाव्यांचे आयोजन केले आहे. या सर्व मेळाव्यांना चळवळीचे स्वरूप दिलेले आहे. इ. घडामोडींचा प्रभाकर मांडे यांनी आपल्या लेखातून वेध घेतलेला आहे. गंगाधर पानतावणे यांनी वाङ्मयीन, शैक्षणिक क्षेत्रात जे कार्य केलले आहे त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या लेखनात पडल्याचे दिसून येते. 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' आणि 'वादळाचे वंशज' हे लेखन याच प्रभावातून झालेले आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर त्यांनी विपुल लेखन केल्याचे दिसून येते. यापैकीच 'डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता' हा ग्रंथ होय. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक विचारावर विपुल लेखन झालेले आहे, प्रबंध निर्माण झालेले आहेत परंतु ज्या माध्यमातून त्यांनी जनसामान्यांशी संवाद साधला, समाजप्रबोधनाचे कार्य केले; समाजाला प्रेरणा दिलेली आहे, त्याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झालेले आहे. गंगाधर पानतावणे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रवर्तक लेखनाची दुर्मिळ नियतकालिके मिळविलेली आहेत आणि त्यांचा चिकित्सक अभ्यास करुन प्रबंध मराठवाडा विद्यापीठाला सादर करून पीएच. डी. प्राप्त केलेली आहे. याचाच परामर्श प्रभाकर मांडे[११] यांनी आपल्या लेखातून घेतल्याचे दिसून येते.

## ३.२ तत्त्वनिष्ठ विचारवंत :-

दलित साहित्य चळवळीने १९६५-७० नंतरच्या कालखंडात जोर धरलेला आहे. गंगाधर पानतावणे यांनी वैचारिक व संपादकीय कार्याने या चळवळीला जो हातभार लावलेला आहे यातूनच प्रकट झालेल्या तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्वाचा बाळकृष्ण कवठेकर यांनी 'तत्त्वनिष्ठा जपणारा सहिष्णू विचारवंत' या लेखात अभ्यास मांडल्याचे दिसून येते. पानतावणे यांचे चर्चासत्रातून प्रकट होणारे वैचारिक व्यक्तिमत्त्व, त्यांचे वाङ्मयविषयक मते आणि त्यातून मिळणारी वैचारिक मेजवानी इ. परामर्श आलेला आहे.

दलित साहित्य चळवळ आणि दलित साहित्याचा प्रवाह यांच्यातील संबंधांचा शोध घेतलेला आहे. पानतावणे सरांचे कार्य, दलित साहित्य चळवळीला त्यातून प्राप्त झालेले बळ इ. चा सखोल विचार आलेला आहे. कोणतीही साहित्यचळवळ केवळ लेखकाची नसून वाचक तिच्यात सहभागी झाल्याशिवाय तिला पूर्णता येत नाही, हेच दिसून येते. परिसंवाद, निबंध वाचन, चर्चासत्रे, काव्यवाचन इ. उपक्रमांनी गजबजलेले अस्मितादर्शचे मेळावे सृजनशील ठरलेले आहेत. नव्या अभिरूचीचे संवर्धन करण्याचे कार्य अस्मितादर्श आणि या मेळाव्यांनी केलेले आहे.

गंगाधर पानतावणे यांचा साहित्यविचार त्यांच्या जीवनाचाच एक भाग आहे, हे दिसून येते. साहित्य हे जगण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झालेले आहे. म्हणूनतच ते मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे हा पानतावणे यांचा आशावाद बाळकृष्ण कवठेकर यांनी दाखवून दिलेला आहे. एक समीक्षक म्हणून गंगाधर पानतावणे यांची जीवनवादी भूमिका येथे दिसून येते.

सुरूवातीला एक ज्येष्ठ सहकारी म्हणून आणि नंतर विभागप्रमुख पानतावणे सरांशी जुळलेला स्नेह आणि त्यातून प्रकटलेले ऋणानुबंध यांचेही विवेचन बाळकृष्ण कवठेकर यांच्या लेखात आहे. मराठी विभागप्रमुख म्हणून त्यांची असणारी कार्यशैली त्यांच्या शैक्षणिक दृष्टिकोणाचा प्रत्यंतर देणारी आहे हेच दिसून येते.

## ३.३ साहित्यविषयक विचार :-

गंगाधर पानतावणे यांचे साहित्यविषयक विचार करणाऱ्या लेखांमध्ये मनोहर जाधव यांचा महत्त्वपूर्ण लेख आलेला आहे. पानतावणे यांच्या विवेचनातील वैचारिक मांडणीचे विशेष येथे दिसून येतात. त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वातील कवी आणि ललित लेखक नकळतपणे कसा प्रकट होतो हेच या लेखात आलेले आहे. 'वाचक' आणि 'रसिक' अशा दोन्ही प्रकारच्या वाचकवर्गाला ( सामान्य व चोखंदळ वाचक ) सहज समजू शकेल अशी भाषिक मांडणी पानतावणे करतात हेच मनोहर जाधव यांच्या लेखनातून आलेले आहे. " ज्याप्रमाणे केवळ कल्पकतेमुळे किंवा साहित्याच्या अभ्यासामुळे निर्माण झालेले, साहित्य श्रेष्ठ ठरत नाही, त्याप्रमाणे समाजचित्रण रेखाटले की ती कलाकृती श्रेष्ठ ठरणार नाही.

साहित्यनिर्मात्याला जीवनासंबंधी सखोल आस्था असावी लागते. त्यांचे समाजविषयक चिंतन व्यापक असावे लागते. एवढेच नाही तर सामाजिक जीवनातील द्वंद्वाचे त्यांचे आकलन अंतर्भेदी असावे लागते. मानवी जीवनातील अंतरंगाचा निरंतर शोध हीच श्रेष्ठ साहित्याची खूण असते. हा शोध न संपणारा असतो. म्हणून सामाजिक प्रबोधनवादी साहित्यनिर्मात्याला समाजप्रवाहाच्या काठाकाठाशी पोहून चालत नाही, त्याला आत उडी घ्यावी लागते. बुडी मारावी लागते. मगच त्याची साहित्य स्फुरणे संवेघ व श्रेष्ठ प्रतीची ठरतील. साहित्यनिर्मात्याचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व येथेच आकाराला येते..... वैचारिकता ही वांझोटी नसावी, बुद्धिवादाची शाब्दिक कसरत नसावी, पोथीबंद अभिव्यक्ती नसावी, तर मानवी चेतनेचा तो आविष्कार असावा.''[१२] अशा स्वरूपाची सहज भाषिक मांडणी पानतावणे सरांनी केल्याची दिसून येते. विचारांची परिपक्वता ही विद्वतजडतेतून प्रकटण्याऐवजी पानतावणे यांच्या सहज भाषिक मांडणी व ओघवत्या शैलीतून प्रकट झाल्याचे दिसून येते. लालित्याचा वापर या वैचारिक मांडणीमध्ये झाल्यामुळेच वैचारिक गंभीरता येथे ऱ्हास पावलेली नाही.

''साहित्याचे उत्कृष्ट आणि निकृष्ट साहित्य असे दोन प्रकार अस्तित्वात असतात आणि वाङ्मयीन गुणवत्ता हाच साहित्यकृतीचा खरा निकष असतो.''[१३] हे गंगाधर पानतावणे यांचे मत त्यांची साहित्यविषयक भूमिका स्पष्ट करणारे विवेचन मनोहर जाधव यांच्या लेखात आलेले आहे. दलित लोकवाङ्मय हे अभ्यासाचे दुर्लक्षित क्षेत्र पानतावणे यांनी प्रकाशात आणून या क्षेत्रात अभ्यासकांनी कार्य करण्याची प्रेरणा त्यांनी दिलेली आहे. लोकवाङ्मयातील दलित चळवळ, आंबेडकरवादी मुक्तीलढा इ. इतिहास मौखिक स्वरूपात जतन केल्याचे आढळून येते. दलित स्त्रियांच्या वेदनेची कहाणीही या लोकवाङ्मयात जिवंत आहे. एक निश्चित सीमारेषा तयार करून दलित साहित्यिक व संशोधकांनी या क्षेत्रात कार्य केले तर दलित वाङ्मयाच्या इतिहासातील लुप्त पान प्रकट होईल आणि मौखिक परंपरेचा समृद्ध आविष्कार उपलब्ध होईल. बोली, रूढ परंपरा यांचा वेगळा अर्थ शोधता येईल हेच दिसून येते.

दलित, ग्रामीण, आदिवासी जनवादी साहित्य हे स्वातंत्र्योत्तर काळातील लक्षणीय प्रवाह आहेत. या प्रवाहासंबंधी गंगाधर पानतावणे जी निश्चित मते व्यक्त केली आहेत त्यांचाही परामर्श मनोहर जाधव यांनी घेतलेला आहे. दलित साहित्य चळवळीचे चार-साडेचार दशके नेतृत्व केल्यानंतर केवळ दलित प्रवाहांचाच अभ्यास न मांडता गंगाधर पानतावणे यांनी समकालीन ग्रामीण व आदिवासी साहित्य-प्रवाहाचाही स्वतंत्र विचार केलेला आहे. मराठी साहित्याला गुणवत्ता आणि त्याचबरोबर समृद्ध करण्याचे कार्य या साहित्यप्रवाहांनी केलेले आहे, हेच दिसून येते. या साहित्यप्रवाहांचे वेगळेपण स्पष्ट करताना गंगाधर पानतावणे म्हणतात - ''ही साहित्य निर्मिती आशयाला प्राधान्य देते, रचनातंत्राला नाही. त्यामुळे या आशयवादी साहित्याने प्रस्थापित व रूढ साहित्य जाणिवांना हादरा दिला आहे हे निश्चित. आत्मतुष्टीच्या आणि स्थिर आदर्शाच्या वर्चस्वातून साहित्याला मुक्त करण्याचे ऐतिहासिक कार्य दलित, ग्रामीण व या

नव्या साहित्य प्रवाहांनी केलेले आहे.''[१४] हेच मनोहर जाधव यांच्या लेखातून आलेले आहे. ग्रामीण साहित्यप्रवाहाचा स्वतंत्र विचार करताना पानतावणे यांनी या साहित्यप्रवाहातील विसंगतीवर बोट ठेवले आहे. दलित साहित्य चळवळीतील लेखिकांच्या अल्पप्रमाणाची मीमांसा केलेली आहे, हेच दिसून येते.

## ३.४ वैचारिक लेखन

बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतरच्या कालखंडात 'दलित साहित्य' ही एक वाङ्मयीन चळवळ उदयाला आलेली आहे. आंबेडकर तत्त्वज्ञानाचे तात्त्विक आधिष्ठान या चळवळीला लाभलेले दिसून येते. या चळवळीतील लेखक म्हणून गंगाधर पानतावणे ओळखले जात आहेत. ललित लेखन आणि व्यापक स्वरूपात वैचारिक लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांची वैचारिक भूमिका मूल्यवेध (१९७६), विद्रोहाचे पाणी पेटले आहे (१९७६), दलितांचे प्रबोधन (१९७८), वादळाचे वंशज (१९८२), प्रबोधनाच्या दिशा (१९८४), चैत्य (१९९०) आणि साहित्य : प्रकृती आणि प्रवृत्ती (१९९९) प्रकट झालेली आहे. या सर्व वैचारिक लेखनाचा नीळकंठ शेरे यांनी प्रस्तुत लेखनात परामर्श घेतलेला आहे.

गंगाधर पानतावणे यांचा प्रारंभीचा प्रकाशित झालले वैचारिक ग्रंथ मूल्यवेध (१९७६) हा आहे. वैचारिक ग्रंथांची समीक्षा करणारा हा ग्रंथ आहे. ग्रंथ-लेखकांच्या तात्त्विक भूमिका, त्यांचे स्वरूप, मर्यादा त्यातील उणीवा यांची यामध्ये चर्चा आलेली आहे. त्यापैकीच एक म्हणजे गो. मो. रानडे यांचा 'महाराष्ट्रातील समाजविचार' या ग्रंथाचा विवेचक अभ्यास पानतावणे यांनी मांडलेला आहे. लालजी पेंडसे यांच्या 'सप्तपदी' आणि 'नवमतवाद' या ग्रंथातील वैचारिकतेचाही अभ्यास पानतावणे यांनी मांडलेला आहे. वा. ना. कुबेर यांच्या 'आंबेडकर विचारमंथन' या ग्रंथामध्ये अस्पृश्योद्धार केंद्रस्थानी हेतूने वैचारिक अन्वयार्थ लावलेला आहे. ग. त्र्य. माडखोलकर यांच्या 'महाराष्ट्राचे विचारधन' या ग्रंथातील उणीवा पानतावणे यांनी दाखवून दिलेल्या आहेत. हेच दिसून येते.

पानतावणे यांचा दुसरा वैचारिक ग्रंथ 'दलितांचे प्रबोधन' (१९७८) हा सामाजिक, राजकीय समस्यांचा वेध घेणारा आहे. विषयाच्या अनुषंगाने चिंतनात्मक लेखसंग्रह या ग्रंथामध्ये आलेला आहे. शिक्षण हाच सर्वांगीण सुधारणेचा पाया आहे. दुर्बल आणि शोषित दलितांसाठी शिक्षण हीच उपयुक्त गरज आहे. हाच निष्कर्ष पानतावणे यांनी काढला आहे. या ग्रंथामध्ये नवबौद्धांची चिकित्सा केलेली दिसून येते. धर्मांतरित महार बौद्ध भिक्खू या सर्वांवर केलेली टीका विधायक आहे.

'वादळाचे वंशज' (१९८२) या ग्रंथामध्ये दलित चळवळीतील शाहीर, कार्यकर्ते, विचारवंत यांच्या व्यक्तित्वाचा आलेख मांडून त्यांच्या विचारांचा स्वतंत्र मूल्यात्मक विचार मांडलेलाआहे. गोपळबाबा वलंगकर, के. ना. देव, तुकाराम अंबादास पुरोहित, शाहीर भीमराव कर्डक, कवी दलितानंतर, कवी श्रीधर, शांताबाई दाणी, हरिराव सोनुले. वसंत मून इ. व्यक्तिमत्त्वाचा स्वतंत्र विचार आलेला आहे. अनेक लेखांमधून सामाजिक व धार्मिक प्रश्नांची चर्चा आलेली आहे.

'प्रबोधनाच्या दिशा' ( १९८४) या ग्रंथामध्ये म. फुले आणि आंबेडकर यांच्या चळवळीचा अन्वयार्थ लावलेला आहे. समकालीन सामाजिक तसेच सांस्कृतिक प्रश्नांचा मागोवा या ग्रंथातून घेतल्याचे दिसून येते. या ग्रंथामध्ये पानतावणे यांनी आंबेडकर व मार्क्स यांच्यातील समन्वयाला विरोध दर्शवून त्यांच्यातील साम्यांवर भर देण्याऐवजी भेदांवर भर दिल्याचे दिसून येते.

चैत्य (१९९०) या ग्रंथामध्ये गंगाधर पानतावणे यांनी या विविध ग्रंथांना प्रस्तावना दिलेल्या आहेत. त्यांचा संग्रह आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने रा. व. इंगळे यांच्या 'महारांचा सांस्कृतिक इतिहास', डॉ. पी. ए. गवळी यांच्या 'पेशवेकालीन गुलामगिरी' व 'अस्पृश्यता', दीनबंधू शेगांवकरांच्या 'त्रिशरण आणि रजनीशांचा उलटा क्रम' या ग्रंथाना दिलेल्या तीन महत्त्वाच्या प्रस्तावनांचा समावेश आहे. या प्रस्तावनांमधूनच साहित्य, समाज आणि संस्कृती विषयक पानतावणे यांची भूमिका स्पष्ट झालेली आहे, हेच दिसून येते. 'निमित्त - महारांचा सांस्कृतिक इतिहास' या लेखांमध्ये संस्कृती आणि चळवळींचा इतिहास इ. बाबतची मौलिक चर्चा आलेली आहे. भारतीय संस्कृतीमधील बहुतांश चांगला भाग बौद्ध संस्कृती आणि तत्त्वज्ञानाशी निगडीत आहे हेच दिसून येते.

'साहित्य : प्रकृती आणि प्रवृत्ती' ( १९९९) हा वाङ्मयीन समीक्षा ग्रंथ असला तरी या लेखनामध्ये काही वैचारिक भाग आलेला आहे. यातीलच महत्त्वपूर्ण भाग म्हणून भारतीय वैचारिक संघर्षाचे स्वरूप स्पष्ट झालेले आहे. याशिवाय या ग्रंथामध्ये आणखी एका गोष्टीवर प्रकाश टाकल्याचे दिसून येते. आंबेडकर-माटे यांच्यातील संघर्षावर प्रकाश टाकला आहे.

एकूणच गंगाधर पानतावणे यांनी आंबेडकर विचारांचा अन्वयार्थ लावून आपले लेखन केल्याचे दिसून येते.

## ३.५ दलित साहित्य, संत साहित्य आणि इतर विचार :-

दलित साहित्य, संत साहित्य आणि इतर विषयासंबंधीचे पानतावणे यांचे विचार गौरवग्रंथांमधील लेखांमधून आलेले आहेत. दलित साहित्य या संकल्पनेचे दलित-अदलित विद्वानांनी वेगवेगळे अर्थ विषद केलेले आहेत. मात्र पानतावणे यांची दलित साहित्याविषयीची ठाम भूमिका भ. मा. परसावळे यांनी 'दलित साहित्य, संत साहित्य आणि पानतावणे' या लेखात स्पष्ट केलेली आहे. पानतावणे यांच्या मते - 'अस्मितादर्श हे आंबेडकरवादाचे अपत्य असून serve, speak & fight ही त्रिसूत्री अस्मितादर्शने स्वीकारली आहे. तसेच आंबेडकरवाद ही दलित साहित्याची प्रेरणा असून हीच अस्मितादर्शची प्रतिज्ञा आणि जीवनदृष्टी आहे' हीच संकल्पना अधिक स्पष्ट करताना ते म्हणतात - ज्यांचे मनुष्यत्व नाकारले गेले व ज्यांची सामाजिक प्रतिष्ठा या देशात शून्य होती असा माणूस दलित या संज्ञेस पात्र ठरतो. आर्थिकदृष्ट्या शोषित असलेला श्रमजीवी वर्ग दलित ठरू शकत नाही. त्यांची दलित ही संकल्पना पूर्णपणे

भिन्न आहे. केवळ नशिबावर विसंबून, नियतीची करूणा भाकणारे आणि मृत्यूनंतर मुक्तीची आस बाळगणारी परंपराशरण दलित ही संकल्पनाही त्यांना मान्य नाही. संत चोखामेळा हे दलित पूर्वज असले तरी त्यांचे आध्यात्मिक आक्रंदनही पानतावणे यांना मान्य नाही. हेच दिसून येत. "दलितेतर मग तो कितीही नवनवोन्मेषशानिनी प्रतिभेचा व प्रज्ञेचा असला तरी त्याची दलित जीवनाची मांडणी कल्पनेच्या आणि सहानुभूतीच्या क्षेत्रातील असेल प्रत्यक्ष अनुभूतीचा स्पर्श नसेल." "असे उपरे साहित्य मनुष्यत्व हिरावून घेतलेल्या माणसांच्या दु:खाला गोंजारते."[१५] अशा रितीने अदलित लेखकाची सहानुभूती व जाणीव त्यांनी दाखवून दिलेली आहे. गंगाधर पानतावणे यांचे हे मानसशास्त्रीय सत्य अदलित-लेखक व समीक्षक यांना आत्मपरिक्षण करायला लावणारे आहे आणि दलित अनुभूतीच्या शोधाला प्रेरित करणारे आहे.

### ३.६ संत साहित्यविषयक विचार :-

संत साहित्यामधील वर्णाश्रमधर्मीचा जो गौरव केला गेलेला आहे तो गंगाधर पानतावणे यांना मान्य नाही. संत साहित्याविषयी गंगाधर पानतावणे म्हणतात - "संत साहित्याने मराठी साहित्याला सोपेपणा, साधेपणा, सौजन्य दिले असेल. प्रापंचिक नैतिक शिकवण दिली असेल, पण सामाजिक प्रतिष्ठेचा, माणसाच्या सामाजिक पारिवर्तनाचा उद्‌गार दिला नाही."[१६] आशयाच्या दृष्टिकोणातून दलितांसाठी संत साहित्य हे निकामी ठरलेले आहे. म्हणूनच दलित साहित्याने संत साहित्य नाकारलेले आहे. दलितांच्या बाबतीत संत साहित्याचे पानतावणे यांनी केलेले परीक्षण काहीसे रोखठोक आणि परखड आहे. त्यांचे हे परिक्षण केवळ संत साहित्यविषयक चर्चेलाच नव्हे तर संत साहित्य विषयक अभ्यासालाही एक नवे आवाहन ठरलेले आहे. संत साहित्याबद्दलची गंगाधर पानतावणे यांची ही भूमिका समजून घेत असताना नाण्याची दुसरी बाजू अत्यंत महत्त्वाची आहे. पानतावणे सरांनी संत साहित्याची अवहेलना केलेली नाही तर केवळ दलित संकल्पनेबद्‌दल अभ्यास मांडत असताना संतांच्या मर्यादेचा व विवशतेची शोकांतिका मांडलेली आहे. परंतु याचबरोबर "वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण । हे द्विजन्मे तिन्ही वर्ण । यांचे जे सुक्षूषण । ते शूद्र कर्म ।" हे कर्तव्य लागणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या भाषासामर्थ्याचा गौरव केलेला आहे.

### ३.७ दलित साहित्य चळवळीचे त्रिपिटक :-

बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक प्रेरणेवर उभारलेला दलित साहित्य चळवळीचा आणि गंगाधर पानतावणे यांच्या कार्याचा परामर्श ऋषीकेश कांबळे यांनी 'दलित साहित्य चळवहीचे त्रिपिटक' या लेखात परामर्श घेतलेला आहे. दलित साहित्याची नेमकी प्रेरणा कोणती आहे ? आंबेडकरवाद की मार्क्सवाद ? अशावेळी पानतावणे यांनी आंबेडकरवादी हीच दलित साहित्याची प्रेरणा आहे हे ठणकावून सांगितलेले आहे. वर्णसंघर्ष आणि वर्गसंघर्ष यांच्यातील भेदाचे तात्त्विक विवेचन त्यांनी केलेले आहे.

गंगाधर पानतावणे हे आंबेडकरी विचार व चळवळीचे भाष्यकार म्हणून ओळखले जातात. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना केंद्रवर्ती मानून त्यांनी वाङ्मयीन चळवळ प्रज्वलीत केली, हेच दिसून येते.

अशा रितीने विचार या गौरवग्रंथाच्या दुसऱ्या भागामध्ये गंगाधर पानतावणे यांच्या आंबेडकरनिष्ठ विचारांचा वेध घेतलेला आहे. दलित साहित्य चळवळीमध्ये अस्मितादर्शच्या योगदानाचाही परामर्श आलेला आहे. आणि त्यातुन दलित साहित्य चळवळीला व एकूणच दलित साहित्य प्रवाहाला प्राप्त झालेली दिशा दिसून येते.

**४. साहित्य, समाज आणि संस्कृती :-**

'साहित्य, समाज आणि संस्कृती' या गंगाधर पानतावणे यांच्यावरील गौरवग्रंथाच्या पहिल्या 'अनुबंध' या भागातून पानतावणे यांच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच त्यांच्या समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा मागोवा आलेला आहे. 'विचार' या गौरवग्रंथाच्या तिसऱ्या भागामध्ये त्यांच्या आंबेडकरनिष्ठ विचारांचा परामर्श घेण्यात आलेला आहे. तर 'साहित्य, समाज आणि संस्कृती' तिसरा भाग स्वतंत्र आणि वेगळा आहे. पानतावणे यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाबरोबरच त्यांनी ज्या ज्ञानक्षेत्रात कार्य केलेले आहे. त्याबद्दल मान्यवर समीक्षक व विचारवंतांचे हे लेखन महत्त्वपूर्ण आहे. निमित्ताने केलेले हे लेखन मराठी समीक्षेला व एकूण सामाजिक वाटचालीस पूरक ठरणारे आहे.

साहित्य, समाज आणि संस्कृती या भागामध्ये साहित्य, समाज आणि संस्कृती याबद्दलचे मौलिक चर्चा घडविणारे चिंतन आलेले आहे. विविध विचारवंतांच्या लेखांमधून साहित्य, समाज आणि संस्कृतीबद्दलचे अभ्यासविषयक नवार्थदर्शन दिसून येते.

१) विकासवाद आणि कला - म. भि. चिटणीस

२) शिक्षण आणि संस्कृती - नरहर कुरूंदकर

३) दलित अभिजनवाद - रा. ग. जाधव

४) 'दलितांची आत्मकथन' - काही प्रश्न - भालचंद्र फडके

५) प्रतिकारवादी सौंदर्यशास्त्र : ग्रामीण व दलित साहित्य - आनंद पाटील

६) भारतीय राज्यघटना - रावसाहेब कसबे

७) बाबासाहेब आंबेडकर यांची समाजरचनेची सैद्धांतिक मांडणी - सुधाकर गायकवाड

८) आंबेडकर आणि बौद्ध तत्त्वज्ञान - ना. प. मंगुडकर

९) सांस्कृतिक दहशतवाद आणि भारताचे भवितव्य - कुमुद पावडे

१०) सेक्युलर राज्य व बुद्ध धर्म - दि. ना. खैरकर

११) फुले - आंबेडकरांना अभिप्रेत असलेला भारत - सदा कऱ्हाडे

१२) दलित साहित्याचे निराळेपण - प्रभाकर मांडे

१३) आंबेडकर आणि प्राचीन शासनव्यवस्था - रत्नाकर गणवीर

१४) भगवान बुद्ध आणि यज्ञसंस्था - वसंत मून

अशा वैविध्यपूर्ण लेखमालेतून साहित्य, समाज आणि संस्कृतीविषयक विविध पैलूंची मीमांसा केलेली आहे. प्रस्तुत समीक्षापूर्ण लेखांमधून साहित्याच्या विविध अंगोपांगांचा अभ्यास मांडलेला आहे. हेच दिसून येते. कलेचा विकासवादी विचार तसेच शिक्षण आणि संस्कृती यांच्यातील नातेसंबंध शोधण्यावर भर दिलेला आहे. दलित साहित्यातील अभिजनवादाचे सखोल विवेचन आलेले आहे. दलित आत्मकथनाचा स्वतंत्र अभ्यास मांडलेला आहे. एकाचवेळी आंबेडकर आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा स्वतंत्र परामर्श घेतलेला आहे.

## ४.१ 'विकासवाद आणि कला' - परस्पर संबंधाचा शोध :-

'विकासवाद आणि कला' या लेखातून म. भि. चिटणीस यांनी त्यांच्यातील परस्पर संबंधाचा शोध समीक्षेच्या दृष्टिकोणातून घेतला गेलेला आहे. भिन्न शैलीतील विकासवर्तुळाच्या अनुषंगाने श्रेष्ठ दर्जाच्या कलेचा विचार मांडलेला आहे हेच दिसून येते. सर्वप्रथम स्पेन्सरच्या कलाविकास सिद्धांताचे विवेचन आलेले आहे.

### ४.१.१ स्पेन्सरचा कलाविकास सिद्धांत :-

कलाविकास संबंधीचा आद्य सिद्धांत जो स्पेन्सरने १८५७ मध्ये मांडलेला आहे. त्यांचेच विवेचन आलजेले आहे. विकास म्हणजे काय ? याचाही सविस्तर परामर्श घेतलेला आहे. माणसाचा सामाजिक व मानसिक विकास घडत असतानाही केवळ अध्यात्मिक म्हणून समजले जाणारे गमक स्पष्ट केले आहे हेच दिसून येते. विकास म्हणजे एकजिनसीपणाकडून बहुजिनसीपणाकडे तसेच अनिश्चितापासून निश्चिताकडे होणारे वाटचाल. या सर्व प्रक्रियेबद्दल प्रारंभी स्पेन्सरने 'Progress' ( प्रोग्रेस ) हा शब्द वापरलेला आहे. परंतु त्यानंतर डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतानंतर हा 'Evaluation' शब्द उपयोजिलेला आहे हेच दिसून येते. डार्विनच्या विकासवाद ( सिद्धांतावाद ) मानवाच्या वानरापासून आदिमानवाच्या अवस्थेपर्यंतचा विकासदाखविलेला आहे तर स्पेन्सरच्या सिद्धांतानुसार आदिमानवाचा आधुनिक मानवापर्यंतचा विकास स्पष्ट केलेला आहे.

विकासवादातील मूलतत्त्वांचेही येथे विवेचन केलेले आहे. आधुनिक विकासववाद हा जग, जीवन, मानव आणि संस्कृती यांची ऐतिहासिक उत्पत्ती उत्क्रांतीच्या सिद्धांताले लावलेली आहे, हेच दिसून येते. विकासवादाच्या या भौतिक भूमिकेचा ज्यांनी पुरस्कार केलेला आहे, त्या वाङ्मयेतिहासकार

हिपोलाइटट्रेन, नैसर्गिकतेचा पुरस्कर्ता एमिल झाला. कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादी समीक्षक थॉमस मनोरा यांच्या भूमिकेचाही स्वतंत्र विचार केला गेलेला आहे.

या सर्वांबरोबरच 'कला हा आधिदैविक चमत्कार आहे' या विकासवादाच्या विरोधी भूमिकेचाही स्वतंत्र परामर्श घेतलेला आहे.

### ४.१.२ कला व शास्त्रे यांचा विकासवादाच्या संदर्भात विचार :-

स्पेन्सरच्या सांस्कृतिक विकासवादामध्ये साहित्य, कला याचबरोबर शास्त्राचाही विकास होतो हेच येथे दिसून येते. शास्त्राप्रमाणे कलेचा बरोबर विकास होतो का ? या प्रश्नाचा येथे विचार आलेला आहे. शास्त्रांमध्ये सदैव नवीन शोधांमुळे भर पडत असते. त्यामुळेच शास्त्रांमध्ये सदैव बदल संभवतात. शास्त्रीय व पाठ्यपुस्तके सदैव बदलत असतात. कलेबाबत मात्र असे घडलेले दिसून येत नाही. थोर कलाकृती काळ लोटला तरी तिचे अस्तित्त्व नाकारले जाऊ शकत नाही. काळानेही त्याचे श्रेष्ठत्त्व सिद्ध केलेले आहे. उदा. महाभारत. कलाकृती हा स्वयंपूर्ण चमत्कार आहे हे मानले. मात्र विकासवादापासून अलिप्त आहे, हेच येथे दिसून येते.

### ४.१.३ विकासवाद व नवी समीक्षा सहसंबंध :-

विकासवादाचा अनेकांगी अर्थ लावण्याचा प्रयत्न आधुनिक समीक्ष संप्रदायांनी केलेला आहे. साहित्यकृतींचा एकंदर साहित्याशी संबंध जोडून साहित्यकृतीचे ऐतिहासिक व सामाजिक स्थान निश्चित होईल अशा समीक्षेला संदर्भवादाचा विरोध आहे. या समीक्षा पद्धती विकासवादाला प्रतिकूल अशा आहेत. विकासवादाला अनुकूल अशा केवळ दोन समीक्षा पद्धतींचा परिचय येथे घेतला आहे.

यातील पहिली समीक्षा ही वाङ्मयप्रकारांची आहे, हेच दिसून येते. या समीक्षा पद्धतीचा आद्यप्रवर्तक फर्दिनंड ब्रुनुटिअर हा आहे.

### ४.१.४ विकासवाद आणि साहित्यप्रकार :-

विकासवादी समीक्षकांच्या मताप्रमाणे साहित्याचा विकास हा प्रामुख्याने दोन कारणांमुळे झालेला आहे. यातील पहिले कारण म्हणजे साहित्याचा समाजाशी असलेला संबंध आणि दुसरे कारण साहित्यात अंतर्गत कारणामुळे घडून येणारे परिवर्तन होय. ज्याप्रमाणे प्राणीजीवन उदयापासून अस्ताच्या प्रक्रियेतून जात असते त्याचप्रमाणे साहित्य व कला ह्या निरनिराळ्या अवस्थांमधून जात असतात. साहित्याच्या विकासाकडे एक दृष्टीक्षेप टाकला असता असे दिसून येते की, लेखकाच्या कर्तृत्वापेक्षा त्याने ज्या 'प्रकारच्या' माध्यमातून लेखन केलेला आहे त्या प्रकाराला व त्या प्रकारच्या सामर्थ्य व त्या प्रकारच्या सामर्थ्य व प्रभावाला अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे, हेच दिसून येते. म्हणजेच साहित्यप्रकारांची कलांवर देखील सत्ता चालते हेच येथे दिसून येते. साहित्य प्रकारवादी समीक्षकांनी प्रतिभेला दुय्यम स्थान देऊन प्रकारांना अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे, हेच येथे दिसून येते.

### ४.१.५ रेन वेलेक आणि ऐतिहासिक सापेक्षतावाद :-

रेन वेलेक या समीक्षकांनी 'कनसेप्ट ऑफ क्रिटिसिजम'[१७] या निबंधसंग्रहात साहित्यकृतीचे स्वरूप आणि समीक्षकाची भूमिका या संदर्भात ऐतिहासिक सापेक्षतेवर समीक्षा केलेली आहे. रेन वेलेक यांच्या मते, साहित्यकृती, कविता, कादंबरी, नाटक हे पायाभूत स्त्रोत व त्यांच्यावर पडणारा प्रभाव हे दोन्ही भिन्न स्वरूपाचे आहे, हेच [illegible] स्पष्ट केलेले आहे.

### ४.१.६ विकासवादाला साहित्यकलेतून केला जाणारा विरोध :-

विकासवादाला साहित्याच्या क्षेत्रात मान्यता मिळविण्यास काहीसा विलंब लागलेला आहे. या तुलनेत कलेच्या क्षेत्रात मात्र विकासवादाचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. साहित्यक्षेत्रातील विरोधाचे कारण हे की विकासाची संकल्पना सर्जनशील साहित्यिक आणि त्याच्या साहित्यकृतीभोवती फिरत आहे. केवळ प्रतिभेच्या जोरावर कवीने प्रतिसृष्टी निर्माण केलेली असते. त्याचे काव्य म्हणजे दैवी स्फूर्तीचा आविष्कार मानले गेलेले असल्यामुळेच साहित्यक्षेत्रातून विकासवादाला विरोध केला गेलेला आहे.

### ४.१.७ विकासवादावरील साक्षेप :-

विकासवादा हा एक व्यापक विचार आहे. कार्ल मार्क्सने आपल्या आर्थिक सिद्धांताच्या समर्थनार्थ, एल. एच. मॉर्गनने 'एन्शन्ट सोसायटी' या ग्रंथात सांस्कृतिक अवस्थांतराची उत्क्रांती स्पष्ट करताना विकासवादी सिद्धांताचाच पुरस्कार केलेला आहे. ह्याचाच अर्थ विकासवादाच्या पुढील समीक्षकांनी विकासवाद हाच मार्क्सवाद म्हणून स्विकारलेला आहे.

आधुनिक विकासवादी समीक्षक विकासाच्या स्थित्यंतराचा क्रम निश्चितपणे एकच असलेला दिसून येतो, असे दिसत नाही. कला ह्या उत्क्रांत होतात आणि त्यांचा विकास होतो, असा विश्वास बाळगणारी समीक्षा विज्ञाननिष्ठ आणि मूल्यनिरपेक्ष आहे, असा त्या समीक्षेवर आक्षेप घेतला जाऊ शकतो.

### ४.२ शिक्षण आणि संस्कृती :-

अस्मितादर्शच्या शिक्षण व संस्कृती विशेषांक १९७५ प्रकाशित झालेला नरहर कुरूंदकर यांचा हा लेख गौरवग्रंथांत आलेला आहे. शिक्षण आणि संस्कृती या दोन्ही घटकांचा एकत्र विचार करून त्याचे येथे समर्थन केलेले आहे. ज्याला 'संस्कृती' म्हणून संबोधले जाते यामध्येही समाजमनाचा विचार व वर्तन करण्याचाच भाग सामावलेला आहे, हेच येथे दिसून येते. परंतु हा विचार जन्माबरोबरच येत नसून भोवतालच्या सामाजिक प्रभावातून येत असतो, म्हणजेच संस्कृती हे मानवी मनाचे एक प्रकारचे शिक्षण आहे. त्यामुळेच विचाराच्या एका मर्यादेपर्यंत शिक्षण व संस्कृती यांचे ठळक संबंध दिसून येतात. आपल्या देशाचा विचार करावयाचा झाल्यास संस्कृती निर्माण करणे, संस्कृती जतन करणे आणि संस्कृती नष्टदेखील करणे ही सर्व कामे शिक्षण करते हे दिसून येते.

भारत हे एक प्राचीन, पुरातन सांस्कृतिक वारसा लाभलेले राष्ट्र आहे. काही हजार वर्षांचा इतिहास व परंपरा या देशाला लाभलेली आहे. इतिहासातील अनेक पराक्रमांच्या आठवणी, नीतीमूल्ये आणि अध्यात्मिक चिंतन हाच या संस्कृतीचा मुख्य गाभा आहे. ह्या सांस्कृतिक गाभ्याचे जतन करणे, त्याचा विकास करणे इ. सर्व कार्ये शिक्षणाचीच आहेत. या सांस्कृतिक वारसाचे जतन करण्याचे कार्य शिक्षण आजही वर्षानुवर्षे करीत आहे. नव्या संस्कृतीचे जतन, स्वातंत्र्याच्या सर्वांगीण आशयाचा पुरस्कार आणि त्याची तीव्र ओढ ही सर्व शिक्षणाचीच कार्ये आहेत हे दिसून येते.

बर्टंड रसेल यांनी शिक्षणाचे जे दोन प्रमुख हेतू सांगितलेले आहेत त्यांची येथे चर्चा केलेली आहे. उपयोगी नागरिक निर्माण करणे तसेच चांगला माणूस निर्माण करणे हे शिक्षणाचे प्रमुख दोन हेतू सांगितलेले आहेत. इंग्लंडसारख्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या देशातील रसेलने हा शिक्षणशास्त्राचा विचार मांडलेला आहे. समाजाला उपयुक्त आणि उपयोगी नागरिक जर शिक्षणातून निर्माण झाला तर तो उत्पादन क्षेत्रात त्याचा निश्चितच फायदा होईल हे वास्तव त्याने येथे दाखवून दिलेले आहे. स्वत: रसेल हा समाजात वाढलेला आणि समाजव्यवस्थेने प्रभावित झालेला विचारवंत आहे, हेच येथे दिसून येते.

मुख्यत: सामाजिक रचना ही अधिक गुंतागुंतीची आहे. स्वत:च्या न्याय्य हक्कासाठी जर संघर्ष केला नाही तर अन्यायग्रस्त गटांवरील अन्याय वाढतच जातो, हेच प्रामुख्याने स्पष्ट झालेले आहे. शिक्षणांमधून परपरांना विरोध करून नव्या मूल्यांचा स्विकार करणारा नवा दृष्टिकोण निर्माण करणे हे एक आव्हानच आहे हे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने स्वीकारलेले लोकशाहीचे धोरण आणि सामर्थ्यवान लोकशाहीची उभारणी सर्वांना समता, न्याय आणि स्वातंत्र्य मिळवून देण्यात काहीशी यशस्वी ठरलेली आहे, हेच येथे स्पष्ट झालेले आहे.

संबंध शिक्षणव्यवस्था उत्पादन प्रक्रियेशी जोडली गेली पाहिजे, याचाच येथे पुरस्कार केलेला आहे. साधारणत: पाचव्या-सहाव्या वर्षी शाळेत जाणारे मूल वीस-एकविसाव्या वर्षी उत्पादनात अग्रेसर असेल हाच आशावाद येथे निर्माण केलेला आहे. ज्ञानाची कवाडे सर्वजणांसाठी मोकळी करायची असेल तर संस्कृतीचो उपासना करणे आवश्यक आहे हेच येथे दिसून येते.

## ४.३ दलित अभिजनवादाची मीमांसा :-

रा. ग. जाधव यांनी दलित अभिजनवाद ( एलिटिसिझम ) याची मीमांसा केलेली आहे. आज-उद्याच्या दलित साहित्यासंबंधी विचार करता अभिजनवाद ( एलिटिसिझम ) निर्माण होणे आवश्यक आहे हेच येथे प्रतिपादनकेलेले आहे. प्रत्येक समाजात कला, साहित्य, तत्त्वज्ञान, धर्म, नीती इ. सांस्कृतिक परंपरांचे जतन करणारा हा वर्ग आहे. ज्या कलेची साहित्यनिर्मिती समाजात होते तिची परंपरा जोपासणारा अभिजनवर्ग कला-साहित्याची मीमांसाही करतो हेच दिसून येते. या अभिजनवर्गाची अभिरूची परंपरेतूनच

निर्माण झालेली आहे, हेच दिसून येते. हाच वर्ग साहित्यनिर्मितीचे क्षेत्र टिकवण्याबरोबरच हा प्रवाह अधिक समृद्ध करण्याचे कार्य करत असतो हेच स्पष्ट झालेले आहे. एकूणच आधुनिक मराठी साहित्य चे अवलोकन केले असता हीच गोष्ट येथेही लागू झालेली आहे हेच दिसून येते.

दलित साहित्याला, दलित साहित्यासाठी, दलित समाजातून स्वत:चा वर्ग तयार होणे आवश्यक आहे. काही मोजकीच माणसे सुरूवातीला लाभली तर त्याचे गटात व नंतर त्याचे प्रवाहात रूपांतर होण्यास फारसा वेळ लागणार नाही. हा दलित अभिजनवर्गच दलित साहित्याचे स्वरूप, त्याचे गुणदोष, त्यातील प्रवृत्तींची मीमांसा करेल हेच दिसून येते. सामाजिक पुनरूत्थानाच्या लढ्यात निर्मितीरूपाने जे सर्जन निर्माण झालेले आहे त्याचेच संवर्धन करण्याचे कार्य दलित साहित्य आणि अभिजनवर्ग करेल, हीच प्रवृत्ती दिसून येते. परंतु यासाठी या अभिजनवर्गाने दलित साहित्याचे सर्वांगीण निरीक्षण करणे गरजेचे आहे हेच दिसून येते.

साहित्याच्या निर्मितीबरोबरच साहित्याचे संवर्धन कसे करता येईल या हेतूनेच अभिजनवाद निर्माण होणे आवश्यक आहे. समग्र प्राचीन अर्वाचीन मराठी वाङ्मयाची परंपरा यांचा सखोल अभ्यास करून दलित वाङ्मयाच्या अभिरूचीचे वेगळेपण शोधून काढून अभिजनवर्गाने स्वतंत्र परंपरेचे जतन करायला हवे. साहित्याची रूची शोधून काढून त्यांच्या आस्वादाचा अनुभव घेऊन तसेच गुणदोषांची चर्चा करून संवर्धन करणारा अभिजन इष्ट ठरणारा आहे हेच येथे दिसून येते.

### ४.४ दलितांच्या दु:खाचा शोध घेणाऱ्या आत्मकथनांचा समस्यापूर्ण अभ्यास :-

भालचंद्र फडके यांनी दलित आत्मकथनांचा समीक्षापूर्ण अभ्यास मांडलेलाआहे. ''अग्नीमधून गेल्याशिवाय माणसाची शुद्धी होत नाही आणि त्याचे बळ वाढत नाही. म्हणूनच पददलित माणसांना हालअपेष्टांच्या आणि त्यागाच्या अग्निदिव्यातून गेल्याशिवाय मोठेपणा प्राप्त होणार नाही. त्यागाची, हालाची पर्वा न करता एकसारखा लढा चालू ठेवला तरच मुक्ती मिळणार.''[१८] असे आंबेडकरांनी सांगितलेले आहे.

दलित लेखकांनी विषयमतेचा पराजय करून आपला संघर्षाचा लढा सुरू ठेवलेला आहे. हेच येथे आत्मकथनांच्या अभ्यासातून दसिून येते. या आत्मकथनांचे स्वरूप आणि त्यातील जीवनानुभव लक्षात घेतले असता भारतीय समाजव्यवस्थेने या पददलितांच्या नशिबी जे दु:ख लादलेले आहे तेच दु:ख दिसून येते. दया पवार यांच्या वाट्याला समाजव्यवस्थेने जे भयानक दु:ख लादले तेच 'बलुतं' मध्ये आलेले आहे. जीवनात आलेले लहानपणीचे जीवन आणि भयानक अनुभव 'आठवणींचे पक्षी' मध्ये आलेले आहे. प्र. इ. सोनकांबळे यांना जे दु:ख भोगावे लागलेले आहे ते दुहेरी स्वरूपाचे आहे. यातील पहिले कारण गरीबी तर दुसरे अस्पृश्यता हे आहे. या दुहेरी कारणामुळेच त्यांच्या बालपणाची वाताहात झालेली

आहे. पिढ्यान पिढ्या पाठीवर बिऱ्हाड घेऊन एका जागेहून दुसरीकडे स्थलांतर करून गाढवाचे जीवन जगणाऱ्या वेदना लक्ष्मण माने यांनी 'उपरा' मध्ये साकार केलेल्या आहेत.

देवाचे गोठणेमध्ये माधव कोंडविलकर[१९] लिहितात - "टाक्यात टाकलेल्या चामड्याला चुनारंग चिकटावा तशी ही जात मला जन्मापासून चिकटली आहे. आता ती जा म्हटले तरी जात नाही, एक वेळ जानवं तोडता येईल."

आत्मकथन लिहिणारी व्यक्ती कालच्या घडून गेलेल्या जीवनाबद्दल आज लिहित आहे. या लेखनाचा महत्त्वपूर्ण विशेष म्हणजे त्या व्यक्तींच्या आजच्या प्रगल्भ वैचारिकतेचा आत्मकथनातील, जीवनाशी पुसटसाही संदर्भ नाही हेच दिसून येते. 'बलुतं' मध्ये दगडूचे चित्र रेखाटताना त्याला कुठेही आजच्या 'दया' चा स्पर्श होऊ दिलेला नाही. स्वत: दया पवार, दगडू जे जीवन जगत होता त्यापासून खूपच दूर आलेले आहेत. शंकरराव खरातांना स्वत:च्या उज्ज्वल यशानंतर देखील स्वत:च्या दलित समाजाच्या उन्नतीबद्दलची नितांत काळजी आहे. त्यांचे अस्वस्थ मन आणि तळमळ 'तराळ-अंतराळ' मधून प्रकट झालेली आहे.

'उपरा'कार लक्ष्मण माने[२०] यांनी लिहिले आहे की, "जे जगलो, जे भोगलं, अनुभवलं, पाहिलं ते ते तसच लिहित गेलो." म्हणजेच जीवनातील वास्तव संघर्ष त्यांनी येथे दाखवून दिलेला आहे. पण पुढे त्यांनी 'पुन्हा एकदा तेच जगणं जगत आलो' या वाक्यातून मनातला उद्वेग प्रकट केलेला आहे. सर्वच दलित लेखकांनी आपल्या आत्मकथनामध्ये आपला गतकाळ चित्रित केलेला आहे. मग हा गतकाळ कितीही लाजीरवाणा किंवा घृणास्पद असला तरी त्या भूतकाळाशी त्या लेखकाचे नाते आहे, हेच दिसून येते. याबद्दल एक दलित कार्यकर्त्याने त्यांना विचारले - 'बलुत्यांत गू-घाण आहे, आपलीच गोची दाखविण्यात काय हशील आहे ?' हा राग एक अर्थी बरोबरच आहे.

ज्या धर्मव्यवस्थेने दलित समाजावर पशूपातळीचे अत्याचार केले त्या व्यवस्थेचा नि:पात करण्यासाठी समाजाला भानावर आणण्याचे कार्य प्रस्तुत आत्मकथनांनी केले आहे. प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' वाचताना या समाजातील विषमता दिसून येते. या विषमतेचे भयानक स्वरूप आणि दलितांची भूकेची जीवन जाणीव येथे दिसून येते. सोनकांबळे यांनी आठवणीच्या स्वरूपात बालपणाची कथा साकारलेली आहे. या आत्मकथनामधून होणारे भूकेच्या वेदनेचे दर्शन मराठी वाङ्मयात सर्वप्रथम घडले आहे. या आत्मकथनांनीच सर्वप्रथम दलितांच्या वेदनेला वाट मोकळी करून दिलेली आहे. ज्या वाङ्मयाने कामाचार व वामाचाराचे दर्शन घडविले अशा साहित्यासाठी भूकेची वेदना या आत्मकथनांनी दाखविलेली आहे, हेच दिसून येते.

15436

'स्मशनातील सोने' ही अण्णाभाऊ साठे यांची कथा वाचत असताना जीवन जगण्यासाठी जो संघर्ष करावा लागतो त्याचेच चित्रण आलेले आहे. या आत्मकथानांमधून व्यक्त होणारा हा जीवनानुभव समर्थपणे प्रकटला आहे. या आत्मकथनांमधून भूकेची वेदना उत्कटपणे व्यक्त झालेली आहे. परमेश्वराने दिलेले शरीर जगवण्याचा एक अपरिहार्य भाग म्हणून भूक येत असली तरी ती भागवण्यासाठी अनंत यातना या लोकांना सहन कराव्या लागलेल्या आहेत, हेच दिसून येते.

या दलित आत्मकथनांनी मराठी भाषोचा शब्दसंग्रह वाढविलेला आहे, समृद्‌ध केला आहे तसेच बोली या प्रमाणमराठीच्या शोषक नसून पोषक आहेत, हेच येथे स्पष्ट झालेले आहे. 'उपरा' मधील भाषा कैकाड्यांच्या जीवनाचे दर्शन घडविते तर 'आठवणींचे पक्षी' मध्ये मराठवाड्यातील महारी बोलीमधून जीवनदर्शन प्रकट झालेले आहे. माधव कोंडविलकरांच्या 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे'मधून कोकणातल्या चांभारी बोलीतून जीवनदर्शन घडविले आहे. 'तराळ-अंतराळ' मध्ये मल्हारी बोलीला नागरी भाषेचा संदर्भ देण्यात आलेला आहे. 'बलुतं' मध्येही ढंगदार बोलीच्या सहाय्याने जीवनदर्शन घडविले आहे.

एकूणच या आत्मकथनांच्या माध्यमातून दलित समाजाची वेदना प्रकट झालेली आहे. या आत्मकथनांच्या 'वीर नायकांनी' व्यवस्थे विरोधात केलेला संघर्ष येथे चितारला आहे, हेच दिसून येते. 'अंधाराने सूर्य पाहिला तेव्हाच शब्द हुंकारले. नरकाच्या कोंडवाड्यात किती दिवस राहायचे ?' हाच आत्मविश्वास येथे प्रकट झालेला आहे.

### ४.५ प्रतिकारवादी सौंदर्यशास्त्र : ग्रामीण व दलित साहित्य :-

मराठी वाङ्मय परंपरेतील आणि विशेषत: आधुनिक ग्रामीण दलित साहित्यात असणारी प्रतिकारवादी सौंदर्यशास्त्राची जी प्रमुख तत्त्वे आहेत यांचा तौलानिक अभ्यास आनंद पाटील यांनी मांडला आहे. मराठीमधील विद्रोही वाङ्मयाची मांडणी निग्रोंच्या सौंदर्यशास्त्रासमोर झालेली आहे. या साहित्यातील अल्पसंख्याक समाजाचे जे वैचारिक चिंतन झालेले आहे त्याचा परामर्श घेण्यासाठी पर्यायी सौंदर्यशास्त्रांच्या मागण्या पुन्हा-पुन्हा केल्या गेल्या आहेत हेच येथे दिसून येते. कारण मुख्य प्रवाहातील जे मध्यमवर्गीय साहित्य आहे, या साहित्यातून प्रस्तुत वाङ्मय वेगळे आहे याचा दावाही केलेला आहे. परंतु या साहित्याचे नेमके वेगळेपण मराठी भाषा व साहित्य यांच्यात कसे आहे याची व्याख्या प्रतिकारवादी सौंदर्यशास्त्राच्या भाषेत कुणीही केलेली आहे. याशिवाय युरोपिय वसाहतवादाशी संपर्क आल्यानंतर नेमकेपणाने वैशिष्ट्ये शोधली गेली नाहीत हेच दिसून येते.

म. ना. वानखेडे ( दलितांचे विद्रोही वाङ्मय १९८१), शरद पाटील ( अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र १९६७), आनंद यादव ( ग्रामीण साहित्याचे स्वरूप १९७९ ) या सर्व लेखनात असलेल्या प्रतिकाराच्या बीजचा शोध घेतलेला आहे. ग्रामीण व दलित साहित्य या दोन्ही गटांना आपल्या सौंदर्यशास्त्राचे सिद्‌धांतन करणे जमले नाही हेच येथे दिसून येते.

## ४.६ भारतीय राज्यघटना :-

प्रत्येक देशाची राज्यघटना ही त्या देशाची कायदा असते हेच दिसून येते. एक कायदा म्हणून राज्यघटनेला करावी लागणारी कार्ये, त्याचप्रमाणे शासनसंस्था व जनता यांचे परस्परसंबंध तसेच ही कार्ये करण्याची पद्धती या सर्वांचा समावेश राज्यघटनारूपी कायद्यात होतो. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर[२१] यांनी "सध्याची भारतीय राज्यघटना म्हणजे १९३५ च्या ब्रिटिशांनी केलेल्या भारत प्रशासन कायद्याचे विकसित रूप असून तो तिचा आत्मा आहे." असे कबूल केलेले आहे. राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत " १) आम्ही भारतीय जनता .... ही घटना आमच्यासाठी तयार, मान्य आणि स्वीकृत करीत आहेत. २) भारताचे सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य निर्माण करण्याचे आणि ३) भारताचे सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय ४) विचार, उच्चार, श्रद्धा, धर्म आणि उपासना यांचे स्वातंत्र्य ५) दर्जा आणि संधीची समानता आणि ६) व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकात्मता राखणारी बंधुता याची शाश्वती देण्याचे विचारपूर्वक ठरवित आहोत." असे आश्वासन दिले आहे, हेच दिसून येते. ही अश्वेतपत्रिका काहीशी अचंबित करणारी वाटते कारण जन्मजात विषमतेवर आधारलेल्या समाजात राज्यघटनेने राजकीय क्षेत्रात स्वीकारलेली नवी मूल्ये पचनी पडणारी नाहीत. या सर्व गोष्टींचा विचार रावसाहेब कसबे यांच्या 'भारतीय राज्यघटना' या लेखात आलेला आहे.

भारतीय राज्यघटनेवर आलेले स्वतंत्र संकट म्हणून स्वर्णसिंग समितीच्या शिफारशीवर झालेल्या उलट-सुलट चर्चांचा स्वतंत्र परामर्श घेतला आहे. यामध्ये पालखीवाला, रजनी पटेल, सिरवाई, शांतीभूषण, इ. सारख्या घटनातज्ञांनी सहभाग घेतलेला आहे. प्रजासत्ताक गणराज्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या नवमूल्यांवर आधारलेली राज्यघटना आणि राजेशाही, पारतंत्र्य, विषमता, वैर, अन्यायी रूढी यांचेच वर्षोनुवर्षे संस्कार असणारे लोक व एकूणच समाज यांच्यातील अदृश्य संघर्षावर येथे लक्ष वेधले आहे, हेच दिसून येते.

शिक्षणाच्या प्रसारामुळे भारतीय समाजात लोकशाहीची मुळेअधिक घट्ट होतील या घटनाकारांच्या विश्वासामुळेच भारतीय समाजात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केलेले आहे. मार्गदर्शक अशा या तत्त्वांचा स्वीकार करूनच नवे शैक्षणिक आकृतीबंध स्वीकारले गेले आहेत. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत राज्यघटनेत घटनात्मक विधिनियमांचे स्वरूप यावे का न यावे ? याबद्दल असणारा पेचप्रसंग इथे स्पष्ट केलेला आहे. कारण एक वास्तव सत्य येथे प्रकट केलेले आहे. ते म्हणजे कोणतीही राज्यघटना आर्थिक व्यवस्थेचे संदर्भ नाकारू शकलेली नाही. किंबहुना समाजवादी राष्ट्रांनी तर अर्थव्यवस्था हा घटनात्मक विधिनियमाचा महत्त्वपूर्ण भाग मानलेला आहे.

बाबासाहेब आंबेडकरांच्या मताप्रमाणे भारतासारख्या घटनानिर्मिती करण्याची उशिरा संधी मिळालेल्या देशाने इतर देशांच्या राज्यघटनेतील दोषांची नक्कल करू नये. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनाच्या

वतीने केलेल्या शिफारशीत प्रामुख्याने दोन सूचना केलेल्या आहेत -

१) भारताची अर्थव्यवस्था समाजवादाची ठेवावी आणि

२) अर्थव्यवस्था प्रस्थापित करण्याची जबाबदारी घटनात्मक विधिनियमांवर सोपवावी.

बाबासाहेबांची सूचना प्रामुख्याने - ' समाजवाद संसदेच्या इच्छेवर न ठेवता तसेच संसदीय लोकशाही बरखास्त न करता घटनात्मक विधिनियमांच्या सहाय्याने समाजवादाची स्थापना' अशा स्वरूपात होती, हेच दिसून येते.

भारतीय राज्यघटना निर्माण होत असताना झालेल्या चुकांचा येथे सविस्तर परामर्श घेतलेला आहे. ३६८ च्या कलमान्वये दिलेले अधिकार किती संदिग्ध आहेत. त्याचबरोबर मूलभूत हक्काच्या यावीत खाजगी मालमत्तेचा केलेला समावेश, समाजवादी अर्थव्यस्थेचा स्वीकार करताना मूलभूत हक्कांना दिलेले स्थान, घटनेच्या तिसऱ्या भागात संसद किंवा विधिमंडळाला दुरूस्त्या सुचविण्याचे दिलेले अधिकार नाकारून निर्माण झालेले वाद, राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचे नेमकेपणाने स्पष्ट न केलेले स्थान, इ. बहुतेक सर्व चुकांचा येथे नेमकेपणाने वेध घेतलेला आहे.

सरतेशेवटी सध्याचे प्रश्न सुटणारे नसल्यामुळे राज्यघटनेचे पुनर्लेखन करण्याशिवाय गत्यंतर नाही, हाच विचार मांडलेला आहे.

### ४.७ बाबासाहेब आंबेडकर यांची समाजरचनेची सैद्धांतिक मांडणी :-

बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात समाजरचनेची सैद्धांतिक मांडणी कशी करायची होती ? या प्रश्नाचाच मागोवा सुधाकर गायकवाड यांनी प्रस्तुत लेखात घेतलेले आहे. समाजरचना म्हणजे काय? हीच संकल्पना येथे सर्वप्रथम स्पष्ट केलेली आहे. 'समाजरचना' ही संकल्पना हर्बट स्पेन्सर याने सर्वप्रथम समाजशास्त्रात रूढ केलेली आहे, हेच दिसून येते. परंतु तिचा खऱ्या अर्थाने प्रयोग दुसऱ्या महायुद्धानंतर समाजशास्त्रज्ञांनी विशेषत: मानवशास्त्रज्ञांनी केलेला आहे. समाज हा वेगवेगळ्या घटकांचा बनलेला आहे. त्या घटकाचे परस्पर संबंध व त्यांचे संपूर्ण समाजाशी संबंध म्हणजेच समाजरचना होय, हेच दिसून येते. याच अर्थाने बाबासाहेब आंबेडकरांनी रचना हा शब्दप्रयोग प्रथम रसेलवर लिहिलेल्या समीक्षा लेखात वापरलेला आहे. एकूणच माणसाशी असणारा माणसाचा संबंध येथे स्पष्ट केलेला आहे. सामाजिक संबंध आणि समाजरचना यांच्यात असणारे जाळे येथे उलघडून दाखविले आहे.

#### ४.७.१ गटांचे विभाग :-

बाबासाहेब आंबेडकर यांनी गटाचे तीन विभाग मानलेले आहे. १) ऐच्छिक गट २) संघटित गट. ऐच्छिक गटामध्ये प्रवेश घेताना सभासद संघटनेची ध्येयधोरणे लक्षात घेऊनच प्रवेश करतो, हेच येथे दिसून येते. संघटित गटातील प्रवेश हा सामाजिक नियमांच्या कक्षेचाच एक भाग आहे. बाबासाहेब हे

'जात' संघटित घटकाचाच एक भाग आहे हे मानतात. म्हणजेच - संघटित घटकांच्या परस्पर संबंधाने समाजरचना तयार झालेली आहे हेच दिसून येते.

**४.७.२ संस्था :-**

बाबासाहेब आंबेडकर यांनी संस्थेची निश्चित व्यवस्था केलेली नाही हेच दिसून येते. परंतु त्यांच्या मते - 'धर्म ही संस्था आहे.' वेद व स्मृती यांच्यामधून दिसून येणारा 'हिंदू' धर्म हा सामाजिक नियमांची जंत्री आहे.

**४.७.२ संस्था व मानसिकता :-**

धर्म ही एक संस्था असून माणसाची कृती व वर्तणुक या दोन घटकांच्या सहाय्याने तिचे नियंत्रण होत असते हेच प्रस्तुत ठिकाणी दिसून येते. कोणत्याही एका व्यक्तीचे कृती ही दुसऱ्या व्यक्तीच्या संदर्भात दिसून येते. या दोन कृती आणि वर्तन यावरूनच त्यांचे परस्परसंबंध ठरत असतात हेच येथे स्पष्ट होते. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच अर्थाने माणसा माणसातील संबंध व समाजरचना स्पष्ट केलेली आहे.

**४.७.३ संस्थेचे प्रकार :-**

'सामाजिक वर्तन ज्यापासून घडते त्या नियमांची संघटना म्हणजे संस्था' अशी येथे संस्थेची व्याख्या केलेली आहे. सामाजिक नियमांचा हेतू मध्यवर्ती येतो. रसेल याने राज्य, युद्ध, संपत्ती, शिक्षण, विवाह व धर्म अशा प्रमुख संस्था मानलेल्या आहेत. तर बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीसंस्था, धर्मसंस्था, अर्थसंस्था, राजकीय संस्था व नातेसंबंध संस्था या संस्था मानलेल्या आहेत हेच दिसून येते.

**४.७.४ समाजरचनेची प्रभावक्षेत्रे :-**

१) धर्म, अर्थ व सामाजिक प्रतिष्ठा यात सत्तेचा उगम मानला गेलेला आहे.

२) उपनयनाचा अधिकार नाकारून ब्राह्मणांनी शुद्राला अप्रतिष्ठित केले.

३) हिंदू जात पाळतो कारण तसे त्याला धर्म शिकवितो.

बाबासाहेब आंबेडकर यांनी या विधानांमधून समाजरचनेची प्रभावक्षेत्रे दाखवून दिलेली आहेत.

**समाजरचनेची बांधणी :-**

आर्थिक रचना, धार्मिक-सामाजिक रचना व राजकीय रचना या बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या समाज रचनेच्या प्रकारावरून समाजरचना झालेली आहे. हेच दिसून येते. यातूनच एकसंघ समाजरचना अस्तित्वात झालेली आहे. यांच्यातील स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांच्या आधारे होणारा बदल हाच संपूर्ण समाजरचनेतील बदल असतो, हेच दिसून येते.

## ४.८ बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध तत्त्वज्ञान यांचा विचार :-

बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ आक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे दीक्षाभूमीवर आपल्या लाखो अनुयायांसह बौद्धधर्माचा स्वीकार केला. यापूर्वीही देशात अनेक धर्मांतरे घडून आलेली आहेत परंतु यासर्वांहून हे धर्मांतर भिन्न आहे. यापूर्वीची धर्मांतरे एक-दोन कुटूंबांनी किंवा पाच-दहा माणसांनी एकत्र येऊन केलेली आहेत हेच दिसून येते. या धर्मांतरांमागची कारणे भिन्न प्रकारची आहेत. यातील काही धर्मांतरे ही गरीबीमुळे घडून आलेली आहेत तर काही धर्मांतरे सक्तीने घडविली गेलेली आहेत. परंतु आंबेडकर यांच्या धर्मांतरांचे स्वरूप मूलत: भिन्न आहे. सामाजिक समता व स्वातंत्र्य प्राप्त करून घेणे हेच या मागचे उद्देश आहेत, हेच दिसून येते. लाखो लोकांनी एकत्र येऊन केलेले हे आगळेवेगळे धर्मांतर आहे.

बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या बौद्ध धर्माचा पुरस्कार केला त्या धर्माची ठळक वैशिष्ट्ये येथे स्पष्ट केलेली आहेत.

१) अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार करणारा रक्ताचा बिंदूही न सांडता सर्व विश्वभर पसरलेला हा एकमेव धर्म आहे. जगातील सर्व प्रमुख धर्मांच्या धर्मप्रसाराचा इतिहास हा रक्तरंजित आहे, हेच दिसून येते. यांमध्ये प्रामुख्याने ख्रिश्चन तसेच मुस्लिम धर्माच्या धर्मयुद्धांचे येथे विश्लेषण केले आहे हेच दिसून येते.

२) या धर्माचे दुसरे आगळे-वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे देव, आत्मा, स्वर्ग, परलोक, नरक इ. कोणतीही संकल्पना मान्य न करणारा हा धर्म आहे; हे सांगणारा गौतम बुद्ध हा जगाच्या इतिहासातील पहिला धर्मसंस्थापक आहे.

३) बौद्ध धर्माची तिसरी संकल्पना तत्त्वज्ञानावर आधारलेली आहे. हे तत्त्वज्ञान म्हणजे तर्कशुद्ध विचारांवर आधारलेली जीवनपद्धती हेच दिसून येते. या तत्त्वज्ञानामध्ये बुद्धिनिष्ठ भूमिका प्रमुख मानली गेलेली आहे. या तत्त्वज्ञानामध्ये निसर्ग आणि माणूस, समाज आणि माणूस यांचा विचार केला गेलेला आहे. गौतम बुद्धांनी मांडलेले विचार हेच खरे भारतीय तत्त्वज्ञान आहे आणि भारताच्या इतिहासातील पहिले तत्त्वज्ञानी म्हणून गौतम बुद्ध यांचा जो उल्लेख केला जातो यात फार मोठे तथ्य आहे, हेच दिसून येते. प्रज्ञा आणि करूणा ही दोन्ही बौद्ध धर्माची मूलतत्त्वे बाबासाहेब आंबेडकर यांनी मानले आहेत.

भगवान बुद्धांनी आपले तत्त्वज्ञान स्पष्ट करतानाच प्रज्ञा आणि करूणा या दोन मूल्यांवर एकत्रित भर दिलेला आहे, हेच दिसून येते. येथे गौतम बुद्ध आणि येशू ख्रिस्त यांच्यातील फरक येथे स्पष्ट करून दाखविलेले आहे. ख्रिस्ती धर्माचे तत्त्वज्ञान पापमूलक आहे. माणसाचा जन्म अशा प्रकारे यापासून झालेला असल्यामुळेच त्याची ओळ पापाकडेच अधिक असते. त्यामुळेच आपण केलेल्या पापांची क्षमा याचना करण्यासाठी रविवारी चर्चमध्ये नावे लागते. हीच ख्रिश्चन धर्माची धारणा आहे, हेच दिसून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

येते. माणसाची प्रवृत्ती पापमूलक आहे हेच येशू ख्रिस्तांची तत्त्वज्ञान येथे स्पष्ट झालेले आहे. बुद्धाचे तत्त्वज्ञान मात्र यांहून कसे वेगळे आहे, हेच येथे स्पष्ट केलेले आहे. माणूस हा मूलत: सत्प्रवृत्त आहे. यांमुळे त्याची धाव ही नेहमीच चांगल्या गोष्टींकडे असते. या सत्प्रवृत्तीवर गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान आधारलेले आहे, हेच येथे दिसून येते. येशू ख्रिस्त आणि भगवान बुद्ध दोघांचे तत्त्वज्ञान करूणेवर आधारलेले असून देखील दोघांच्या तत्त्वज्ञानात जो मूलभूत फरक आहे, तोच येथे दाखवून दिलेला आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा लावलेला अन्वयार्थ येथे प्रकट झालेला आहे.

## ४.९ सांस्कृतिक दहशतवाद आणि भारताचे भवितव्य :-

अलिकडील काळात घडलेल्या सांप्रदायिक, जातीय व जमातीय दंगलीच्या पार्श्वभूमीमुळे घडून आलेला दहशतवाद आणि आपल्या देशाचे भवितव्य यांची येथे कुमुद पावडे[२२] यांनी चर्चा केलेली आहे. भारतीय राज्यघटनेतील 'धर्मनिरपेक्ष'तेचा अर्थ उलगडून दाखविण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकच शासक बनल्यामुळे शासकांचा धर्म, संप्रदाय, जातीव्यवहारात आपोआपच आले. हेच येथे दिसून येते. याचा परिणाम आज लोकशाही धोक्यात आलेली आहे. या संदर्भात येथे तामीळनाडूमधील निरूनेलवल्ली तालुक्यातील 'तिरूनेलवल्ली' शहरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेली पोलीसी अत्याचारात ११ दलित ठार झाले, तसेच ४२६ जखमी झाले हे उदाहरण स्पष्ट केले आहे. तसेच ४२६ जखमी झाले हे उदाहरण स्पष्ट केलेले आहे. २३ जुलै १९९९ साली ही घटना घडलेली आहे. दलितांचा हाच अपराध होता की - 'कामाला योग्य दाम द्या ?' हीच त्यांची रास्त मागणी होती. हेच येथे दिसून येते. या आरोपींच्या यादीमध्ये -

१) तिरूनेलवेल्लीचे जिल्हाधिकारी श्री. धनवेल (IAS)

२) श्री. राजेन्द्रन (DIG of POlice)

३) श्री. सालेशकुमार याथर(Deputy Commissioner)

४) श्री. वान्यपारूमल (DSP)

५) अन्य पोलीस सबइन्सपेक्टर्स

इ. समावेश केलेला आहे, हेच दिसून येते. 'शासनाने दलितां विरोधात केलेला अत्याचार' अशी ही केस आहे.

### सांस्कृतिक दहशतवाद -

भारतातील सांस्कृतिक दहशतवादाची संकल्पना कुमुद पावडे यांनी उलघडून दाखविलेली आहे. भारतातील सामाजिक, धार्मिकी संस्कृती यांमध्ये परिवर्तन न येता तशीच चालावी, पारंपारिक रूढी, परंपरा टिकून तशाच चालाव्यात, त्याअन्यायकारक असूनही टिकून रहाव्यात, याच मानिकसतेने पछाडलेल्या

समूहाने प्राणघातक हल्ले करून लोकांमध्ये भीती व मानसिक बचावाचे वातावरण तयार होणे हाच सांस्कृतिक दहशतवाद येथे दाखवलेला आहे. या दहशतवादाचा सर्वात अधिक परिणाम अल्पसंख्यांक समाजावर झालेले आहेत, हेच येथे दिसून येते.

राजस्थानातील 'कुम्हेर' या गावी दलितांनी घोड्यावरून वरात काढली या कारणावरून सहा दलितांची हत्या करण्यात आली. पूर्ण भारतभरात थोड्याफार फरकाने हा सांस्कृतिक दहशतवादी घडून येतो हेच येथे दिसून येते. सांस्कृतिक दहशतवादाचे काही सौम्य प्रकार येथे स्पष्ट केलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने -

१) इतिहसाचे पुनर्लेखन - 'आर्य भारतातील आहेच ते परकीय नाहीत' या संदर्भात लो. टिळकांसारख्या हिंदुत्त्ववादी संशोधकालाही खोडले जाते.

२) नथुराम गोडसेसारख्या खुनी माणसाला नायक बनविणे,

३) अभ्यासक्रमात चुकीची ऐतिहासिक माहिती,

४) प्रसारमाध्यमांचा खोटा वापर,

५) किर्तन, प्रवचनांतून अल्पसंख्याकांबद्दल टाकून बोलणे,

६) अंधश्रद्धा पसरविणे उदा. 'गणपतीचे दुग्धपान'

७) विषमतेचा जनक 'मनू'चा गौरव करणे,

८) आंतरजातीय विवाहकर्त्यांचा छळ करणे,

९) आरक्षणाच्या प्रश्नांवर मागासवर्गीयांचा छळ,

इ. सांस्कृतिक दहशतवादाची सौम्य उदाहरणे येथे दिसून येतात.

**सांस्कृतिक दहशतवादाचा परिणाम -**

सांस्कृतिक दहशतवादामुळेच जातीय व धार्मिक दंगली घडून आलेल्या आहेत. यामुळेच सर्वसामान्य लोकांचे जीवन असुरक्षित बनले आहे, हेच येथे दिसून येते. या सांस्कृतिक दहशतवादामुळे भारताचे भवितव्य धोक्यात आलेले आहे. यामुळे स्वातंत्र्य, समता या मूल्यांचा ऱ्हास घडून येत आहे. माणूस माणसापासून तोडला गेल्यामुळे बंधुभाव केवळ शब्दापुरताचे उरेल.

एकूणच प्रस्तुत लेखात कुमुद पावडे यांनी सांस्कृतिक दहशतवाद, त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या इ. कडे लक्ष वेधले आहे.

## ४.१० सेक्युलर राज्य व बुद्‌धधर्म :-

'सेक्युलर' म्हणजे काय ? ही संकल्पना नेमकेपणाने या लेखाच्या सुरूवातीलाच दि. ना. खैरकर यांनी स्पष्ट केलेली आहे. सेक्युलर म्हणजे निधर्मी म्हणजे धर्मातीत राज्य. भारताच्या घटनासमितीने निधर्मी शासन म्हणून संविधान स्विकारलेले आहे. 'सेक्युलर' हा इंग्रजी शब्द आहे. युरोपीय इतिहासात या शब्दाला असणारे वैशिष्ट्यपूर्ण स्थान येथे स्पष्ट केलेले आहे.

### नरहर कुरूंदकर यांच्यामताचा विचार -

नरहर कुरूंदकर यांच्या मते 'सेक्युलरिझम' या संकल्पनेचा "धर्माची इहलौकिक जीवनावरील पकड समाप्त करणे हा मुख्य गाभा आहे." असे मानले आहे, हेच दिसून येते. नरहर कुरूंदकर पूर्णपणे इहलोकवादी आहेत. धर्म व धर्मसंस्था याबद्दलचे मत काहीसे संदिग्ध असले तरी ते चूक मानता येणार नाही हेच दिसून येते.

धर्म ही एक विशाल आणि व्यापक संकल्पना आहे. जीवनाचे रहस्य समजून घेऊन त्याच्याशी सुसंगत व योग्यतेचे जीवन असणे हे धर्माचे कार्य आहे. ही संकल्पना बौद्ध धर्मालाही लागू पडते, हेच दिसून येते. बुद्‌ध धर्म तसेच अन्य धर्म सर्व माणसाने अज्ञाताचा शोध घेतला पाहिले असे मानत आहेत. परंतु ही अज्ञाताची संकल्पना प्रत्येक धर्माने वेगळी मानली आहे. बुद्‌धधर्माने 'अज्ञात' या संकल्पनेची निश्चित व्याख्याच मांडलेली नाही हेच येथे दिसून येते. केवळ दुःख या संकल्पनेचा विनाश करण्याऱ्या गोष्टींचा शोध घेऊन सत्यप्राप्तीचा निश्चि मार्ग बुद्‌ध धर्माने दाखवून दिलेला आहे, हेच येथे दिसून येते. बुद्‌ध धर्मात दुःखाला कारणीभूत ठरणाऱ्या तृष्णा, द्वेष तसेच इतरही निरनिराळे भ्रम दूर करण्यावरच भर दिलेला आहे, हेच येथे स्पष्ट होते. हिंदू धर्मात 'अज्ञाता'ची ही संकल्पना खूप वेगळेपणाने स्पष्ट केलेली आहे. हिंदू धमृत सत्याची एक मूर्त कल्पना स्वीकारलेली आहे. बुद्‌ध धर्माची शिकवण प्रामुख्याने आंतरिक विकासावर भर देते हेच येथे दिसून येते. बुद्‌धधर्माची विचारधारा इहलोकवाद्यांपासून मूलतः भिन्न स्वरूपाची आहे. हेच येथे स्पष्ट झालेले आहे.

## ४.११ फुले-आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या भारताचा विचार :-

सदा कऱ्हाडे यांच्या प्रस्तुत लेखातून फुले-आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या भारताचा विचार येथे आलेला आहे. समाजपरिवर्तन प्रक्रिया गतिमान बनवूनच लोकशाहीचे भवितव्य निश्चित झालेले आहे. याचे सर्व श्रेय हे फुले-आंबेडकर यांच्या प्रयत्नांना जाते, हेच प्रस्तुत लेखातून दिसून येते. फुले-आंबेडकर तत्त्वज्ञानाने महाराष्ट्राची सीमा केव्हाच पार करून त्याला आता राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालेले आहे. एकूणच त्यांचे तत्त्वज्ञान आणि कार्य तसेच त्याला प्राप्त झालले भव्य-दिव्य स्वरूप लक्षात घेतो तो या दोन महापुरूषांच्या अलौकिक गौरव आहे हेच येथे दिसून येते. आजही

त्यांच्या तत्त्वज्ञानाला राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक क्षेत्रात आधिष्ठान लाभले याची गरज भासत आहे.

तत्त्वज्ञानाची नेमकी संकल्पना येथे सदा कऱ्हाडे[२३] यांनी स्पष्ट केलेली आहे. ''तत्त्वज्ञान म्हणजे केवळ विचारतत्त्वांची सैद्धांतिक मांडणी नसते. विचारतत्त्वांच्या मांडणीतूनच आदर्शभूत, कल्याणकारी आणि समावेशक अशी जीवनपद्धती त्यात सांगितलेली असते.'' एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कार्ल मार्क्सने जगातील सर्व श्रमिक-शोषितांच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान अखिल विश्वाला पटवून दिले. याच कालखंडात महात्मा ज्योतीबा फुले यांनी भारतीय समाजव्यवस्थेतील वर्णव्यवस्थेचा धिक्कार करून स्त्रिया व पददलित यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले आहे. शूद्रातिशूद्र यांना 'माणूस' म्हणून हक्क मिळवून देण्यासाठी म. जोतीबा फुले यांनी सत्यधर्माचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. मानवी हक्कांचा जाहीरनामाचे त्यांनी स्पष्ट केलेला आहे हे येथे दिसून येते. महात्मा फुले यांचा संपूर्ण रोख पुरोहितशाही विरोधात होता, हेच येथे स्पष्ट झालेले आहे. त्यांच्यानंतर बाबासाहेब आंबेडकर यांनी पुरोहितशाहीची संपूर्ण उच्चाटन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भारतीय समाजव्यवस्थेतील वर्गलढ्याइतकेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त महत्त्व वर्गलढ्यालाच आहे हे येथे दिसून येते. स्त्री-पुरूष समानतेचा म. फुले यांनी जोरदार पुरस्कार केलेला आहे. महात्मा फुले यांनी दुसरा महत्त्वाचा विचार मांडला तो म्हणजे 'बंधुत्त्व' त्यांचा हा समतावादी विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहे हेच येथे दिसून येते. त्यांचा तिसरा महत्त्वपूर्ण विचार म्हणजे सार्वजनिक सत्यधर्म होय. निर्मिळाचा जो धर्म तोच सार्वजनिक सत्यधर्म होय याचेच येथे प्रतिपादन केल्याचे दिसून येते.

बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांचे तत्त्वज्ञान भक्कम आहे. त्यांनी आपल्या एकूणच तत्त्वज्ञानात समतावादाचा पुरस्कार केलेला आहे. स्वातंत्र्यातून समता आणि समतेहून बंधुता सर्वोच्च पातळीवर मानलेली आहे. गौतम बुद्धांच्या बौद्ध धर्माचा बाबासाहेबांनी पुरस्कार केलेला आहे; हेच दिसून येते. भारतीय समाजव्यवस्थेत असणारी पुरोहितशाही-ब्राह्मणशाही नष्ट करण्याविरोधात दिलेला फुले-आंबेडकर यांनी दिलेला लढा तसेच त्यांचे तत्त्वज्ञान व निधर्मी राष्ट्राची संकल्पना येथे स्पष्ट झालेली आहे, हेच दिसून येते.

## ४.१२ दलित साहित्याचे निराळेपण :-

दलित साहित्याचे मराठी वाङ्मयामधील निराळेपण प्रभाकर मांडे यांनी येथे स्पष्ट केलेले आहे हेच दिसून येते. 'दलित साहित्य' या संकल्पनेबद्दल होणारी चर्चा, 'दलित' या संज्ञेला प्राप्त झालेले स्वरूप इ. विवेचन येथे आलेले आहे. हिंदू समाजव्यवस्थेने काही जातींना अस्पृश्य मानले गेले आहे. समाजजीवनाच्या प्रवाहापासून या जातींना दूर ठेवले गेले आहे. या समाजामध्ये जन्माला येणाऱ्याला या

समाजाचा घटक म्हणून ओळखले जाते, हेच दिसून येते. माणूस म्हणून या समाज घटकाचे मूल्य अव्हेरले गेले. त्यांचे माणूस म्हणून जगणे नाकारले गेले आहे तेच दलित होय.

दलित साहित्य हे समाजगटातील व्यक्तींच्या अनुभवांना व्यक्त करणारे साहित्य आहे.

**दलित साहित्याचे विशेष :-**

१) दलित साहित्यातील अनुभवाचे स्वरूप इतर वाङ्मयातील अनुभवापेक्षा मूलतः वेगळे आहे हेच दिसून येते. हे अनुभव प्रामुख्याने सामाजिक असतात असे गंगाधर पानतावणे यांनी मानले आहे. वाङ्मयीनदृष्ट्या ही निर्मिती एका व्यक्तिमनाचा आविष्कार नसून व्यक्ति आणि समाज यात स्थित असलेल्या समूहमनाचा आविष्कार असते. हेच येथे प्रभाकर मांडे यांनी स्पष्ट केलेले आहे.

२) दलित साहित्य हे केवळ साहित्य नाही. यासाहित्याला एक प्रयोजन आहे. पारंपारिक समाजव्यवस्थे-विरोधात लढणारे प्रभावी अस्त्र आहे. सामाजिक जाणीवा स्पष्ट करणे, वाचकांच्यावर परिणाम अडवून आणणे, समाजबांधवांना क्रांतीसाठी प्रेरित करणे, त्यांच्यामध्ये अन्यायाविरोधात लढण्याचे सामर्थ्य निर्माण करणे इ. प्रयोजनामधून दलित साहित्याची निर्मिती झालेली आहे; हेच दिसून येते.

३) दलित वाङ्मयामध्ये आशयाला प्राधान्य आहे. आशय आणि अभिव्यक्ती यांचे नाते वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे प्रभाकर मांडे यांनी दाखवून दिलेले आहे.

४) लेखक, कवी यांच्या मनातील ताण-तणाव, आंदोलने आणि या सर्व अनुभवांचा अस्सल प्रामाणिकपणा हे सर्व विशेष येथे प्रकट झालेले आहेत.

**४.१३ आंबेडकर आणि प्राचीन शासनव्यवस्था :-**

प्रस्तुत ठिकाणी रत्नाकर गणवीर यांनी प्राचीन शासन व्यवस्थेची त्यांना अभिप्रेत असणारी चिकित्सा केलेली आहे, हेच दिसून येते. प्रचलित समाजात धर्माचे असणारे अवडंबर, हिंदू धर्माने अस्पृश्यांवर केलले अनन्वित अत्याचार आणि एकूणच आंबेडकरांनी हिंदू धर्माची केलेली चिकित्सा प्रस्तुत लेखात दिसून येते.

**४.१४ भगवान बुद्‌ध आणि यज्ञसंस्था :-**

"भगवान बुद्‌धाने यज्ञसंस्थेचा पुरस्कार केला होता." या मताचा येथे चिकित्सक स्वरूपात विद्यागौरी सरखोत[२४] यांनी परामर्श घेतलेला आहे.

**५. पत्रव्यवहार व छायाचित्रे :-**

'साहित्य, समाज आणि संस्कृती' या गंगाधर पानतावणे यांच्या गौरवग्रंथातील चौथा भाग पत्रव्यवहार - छायाचित्रे यांच्याशी संबंधित आहे. मराठी वाङ्मयातील दिग्गजांच्या सहवासातील तसेच

दलित चळवळीतील होतकरू लेखकांपासून नामवंतांच्या सहवासातील ही छायाचित्रे त्यांचे मराठी साहित्य - सांस्कृतिक चळवळीतील योगदानच दर्शवितात. छायाचित्र विभागाच्या सुरूवातीलाच पानतावणे पती-पत्नी यांचे 'श्रावस्ती' सह छायाचित्र आलेले आहे.

पु. ल. देशपांडे, ना. धों. महानोर, कुसुमाग्रज, रा. रं. बोराडे, ग. त्र्यं. माडखोलकर, राजा ढाले, बाबा आमटे, अमेरिकन विदुषी एलिनार झेलिअट, भालचंद्र फडके, केशव मेश्राम, मधुमंगेश कर्णिक, प्रभाकर मांडे, मनोहर जाधव, नरहर कुरूंदकर, फ. मुं. शिंदे, त्र्यं. वि. सरदेशमुख, वामन होवाळ, सुशीलकुमार शिंदे, नागनाथ कोतापल्ले, बाबूराव बागूल, प्रल्हाद चेंदवणकर, दया पवार, ग्रेस, दिलीप चित्रे, जपानी लेखक हिदेआकी इशिदा, लेखिका डॉ. रोझैलिन्ड, फ्रेंच लेखिका मेरी लॉरेलन, अँना ल्युकास, चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल, मुली नंदिता व निवेदिता इ. छायाचित्रे आलेली आहेत.

कवी कुसुमाग्रज, वि. द. घाटे, पु. ल. देशपांडे, बाबा आमटे, कवी ग्रेस, शंकरराव खरात आदींशी केलेला पत्रव्यवहार दलित चळवळ, दलित साहित्य आणि एकूणच मराठी वाङ्मयाबाबतच्या पानतावणे यांच्या विचारांचे दर्शन घडून येते. यातील बहुतेक पत्रे गंगाधर पानतावणे यांचे अभिनंदन तसेच त्यांच्या एकूण कार्याचा गौरव करणारी आहेत.

एकूणच 'साहित्य, समाज आणि संस्कृती' हा गंगाधर पानतावणे यांचा गौरवग्रंथ त्यांच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच वाङ्मयीन कर्तृत्वाची मांडणी करणारा गौरवग्रंथ आहे. प्रस्तुत ग्रंथातून त्यांच्या वाङ्मयीन भूमिकेचे, आंबेडकरवादी विचारांचे विवेचन आलेले आहे. दलित चळवळीला सामर्थ्य प्राप्त करून देण्यासाठी सामाजिक बांधिलकीची त्यांनी निर्माण केलेली भावना, हिंदू मानसिकता त्याग करण्याचे केलेले आवाहन, यातूनच त्यांची आंबेडकरवादी भूमिका ठळकपणे दिसून येते.

'अनुबंध' या गौरवग्रंथाच्या पहिल्या विभागात 'मित्र-सन्मित्र', 'शिक्षक मार्गदर्शक', 'संपादक-लेखक' म्हणून गंगाधर पानतावणे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलघडलेले आहेत. ग्रंथाच्या दुसऱ्या 'विचार' या विभागात पानतावणे यांच्या व्यासंगी आंबेडकरनिष्ठ विचारांचा परामर्श आलेला आहे. ग्रंथाच्या तिसऱ्या विभागात साहित्य, समाज आणि संस्कृतीविषयक समीक्षात्मक चिंतन आलेले आहे. चौथा विभाग पत्रव्यवहार छायाचित्रे यांच्याशी संबंधित आहे.

दलित साहित्य - सांस्कृतिक चळवळीचा पट येथे उलघडून दाखविलेला आहे व त्याचबरोबर सामाजिक सांस्कृतिक घटनांचा मागोवा घेतलेला आहे.

## ७) निष्कर्ष :-

१) 'साहित्य, समाज आणि संस्कृती' हा गंगाधर पानतावणे यांचा गौरवग्रंथ त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील विशेष पैलू तसेच त्यांच्या समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा मांडणी करणारा गौरवग्रंथ आहे.

२) व्यक्तिगत जीवन व वाङ्मयीन कर्तृत्व यांच्याबरोबरच मराठी समीक्षेतील साहित्य, समाज आणि संस्कृती विषयक बहुविध विषयांचा समीक्षात्मक विचार प्रस्तुत गौरवग्रंथात आलेला आहे.

३) 'अस्मितादर्श' च्या रूपाने दलित वाङ्मयामध्ये वैचारिक प्रबोधनाची नवी पायवाट निर्माण झाली व दलित साहित्यचळवळीला एक व्यापक परिमाण लाभले याचाच आलेख मांडलेला आहे.

४) विचारवंत, संपादक, समीक्षक, साहित्यिक असा गंगाधर पानतावणे यांचा बहुआयामी परिचय घडून आलेला आहे.

५) साठोत्तरी साहित्यप्रवाहातील दलित, ग्रामीण प्रवाहांचे लक्षणीय चिंतन आलेले आहे.

६) साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्या मौलिक चिंतनातून नवार्थदर्शन स्पष्ट झालेले आहे.

७) धर्म, वर्ग, वर्ण्य, शिक्षण, कला, साहित्य यांच्या मौलिक विचारातून सांस्कृतिक मंथन प्रकट झालेले आहे.

## संदर्भ


१) खरात, माधवी (डॉ) - 'साहित्य, समाज आणि संस्कृती - वाङ्मयीन कर्तृत्वाची मांडणी' (लेख), दैनिक सकाळ, १७ सप्टेंबर २००६.

२) जाधव मनोहर (डॉ), देशमुख केशव, कांबळे ऋषीकेश, 'साहित्य, समाज आणि संस्कृती', सुविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००६, 'माझे मित्र - गंगाधर पानतावणे' (लेख) जाधव रा.ग., पृ. २४.

३) तत्रैव, शिंदे फ. मुं, 'गंगाधर पानतावणे आमचे 'सर' संपादक' (लेख) पृ. ४०.

४) तत्रैव, गज्वी प्रेमानंद, 'अस्मितादर्श हाच पानतावणे यांचा गौरव' (लेख), पृ. ५६.

५) तत्रैव, डांगळे अर्जुन, 'दलित साहित्य चळवळीचा आधारवड', (लेख), पृष्ठ ७४-७५.

६) तत्रैव, किरवले कृष्णा, 'एक समाजशिक्षक आणि मार्गदर्शक', (लेख), पृ. ९९-१००.

७) तत्रैव, ठाकूर भगवान, 'गंगाधर पानतावणे एक बहुश्रूत वक्ते', (लेख) पृ. १२१.

८) तत्रैव, हिंगोणेकर शशिकांत, 'गंगाधर पानतावणे जीवनातील प्रेरणादायी व्यक्ती' (लेख) पृ.१२९.

९) खरात, माधवी ( डॉ), साहित्य, समाज आणि संस्कृति, उनि.

१०) मांडे प्रभाकर, 'कवी मनाचा संशोधक' (लेख) उनि, पृष्ठ १३५.

११) तत्रैव, पृ.१३८.

१२) जाधव मनोहर, 'गंगाधर पानतावणे यांचा साहित्यविचार' उनि (लेख) पृ. १४६.

१३) तत्रैव, पृ. १४९-१५०.

१४) तत्रैव, पृ. १५१-१५२.

१५) परसवाळे भ. मा. 'दलित साहित्य, संत साहित्य आणि पानतावणे' ( लेख), उनि, पृ. १९१.

१६) तत्रैव, पृ. १९२.

१७) चिटणीस म.भि., 'विकासवाद आणि कला' ( लेख), उनि. पृ.२२५.

१८) फडके भालचंद्र, 'दलित आत्मकथनं : काही प्रश्न' ( लेख), उनि, पृ. २४५.

१९) तत्रैव, पृ. २४६.

२०) तत्रैव, पृ. २४७.

२१) कसबे रावसाहेब, 'भारतीय राज्यघटना' ( लेख) उनि. पृ. २८१.

२२) पावडे कुमुद, 'सांस्कृतिक दहशतवाद व भारताचे भवितव्य' (लेख) उनि, पृ.३४२.

२३) कऱ्हाडे सदा, 'फुले-आंबेडकरांना अभिप्रेत भारत' (लेख), उनि, पृ.३७१.

२४) सरखोत विद्यागौरी, 'भगवान बुद्ध आणि यज्ञसंस्था', (लेख), पृ.४०८.


----x----